दैनिक राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com
बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२७६ | मंगळवार, दि.२८ जानेवारी २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये




## संपादकीय

### भारताचा गर्भित दम इशारा देणाराच

काश्मीर हा भारताचा मुकुटमणी आहे आणि पीओकेशिवाय ते अपूर्ण आहे, असे राजनाथ सिंह यांनी म्हटले आहे. राजनाथ सिंह यांचे हे विधान फेब्रुवारी १९९४ च्या संसदेच्या ठरावानुसार आहे. यामध्ये पाकिस्तानने आक्रमण करून ताब्यात घेतलेला जम्मू आणि काश्मीर राज्याचा भाग रिकामा करण्याची मागणी केली होती. यावेळी राजनाथ सिंह यांनी १९६५ च्या युद्धाचाही उल्लेख केला. या युद्धामध्ये जम्मू-काश्मीरच्या लोकांनी ना पाकिस्तानला पाठिंबा दिला ना दहशतवादाला याची आठवण त्यांनी करून दिली. संरक्षणमंत्र्यांचे हे विधान अनेकार्थांनी महत्त्वाचे आहे.

# गव्हाच्या बाजाराला यंदाही तेजी

## सरकार ३०० लाख टन खरेदी करणार



**पुणे । प्रतिनिधी**

**गव्हाच्या भावात मागील महिनाभरातच ३ टक्क्यांची वाढ झाली. यंदा गव्हाची पेरणी वाढली. मात्र गव्हाला मागणीही चांगली असेल. तसेच सरकारही बफर स्टॉक करण्यासाठी हमीभावाने गव्हाची खरेदी वाढवेल. आंतरराष्ट्रीय बाजारातही गव्हाला मागणी राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे यंदाही गव्हाला तेजीची हवा मिळेल, असा अंदाज अभ्यासकांनी व्यक्त केला.**

देशात यंदा गव्हाची लागवड वाढली आहे. देशातील गहू लागवड गेल्यावर्षीपेक्षा आणि गेल्या पाच वर्षातील सरासरी लागवडीपेक्षा अधिक आहे. १७ जानेवारीपर्यंत देशात ३२० लाख हेक्टरवर गव्हाची लागवड झाली होती. तसेच यंदा वेळेत लागवड होत असल्याने वाढत्या उष्णतेचा गव्हाच्या उत्पादनावर परिणाम होणार नाही, अशी शक्यता काही कृषी तज्ज्ञांनी व्यक्त केली. त्यामुळे देशात यंदा १ हजार १५० लाख टनांवर उत्पादन पोचेल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. मात्र गहू पिकाला अनेक भागात बदलते वातावरण, वाढत्या उष्णतेचा फटका बसत आहे. तरीही यंदा गेल्यावर्षीपेक्षा अधिक उत्पादन होण्याची शक्यता आहे. मात्र देशात सलग दोन वर्षे जाणवलेला तुटवडा आणि गेल्या वर्षी कमी झालेले उत्पादन यामुळे सरकारकडे बफर स्टॉक कमी झाला.

पान २ वर

### यंदा सरकारकडून गव्हाची खरेदी वाढणार...

सरकारने यंदा गव्हासाठी २ हजार ४२५ रुपये हमीभाव जाहीर केला आहे. यंदाच्या हंगामात सरकारने ३०० लाख टन गहू खरेदीचे उद्दीष्ट ठेवले आहे. २०२४-२५ च्या हंगामात म्हणजेच गेल्या हंगामात सरकारने ३२० लाख टन खरेदीचे उद्दीष्ट ठेवले होते. पण प्रत्यक्षात सरकारला २६६ लाख टनांचीच खरेदी करता आली. सध्या सरकारकडे १८२ लाख टन गव्हाचा स्टॉक आहे. मागील हंगामात याच काळात २०६ लाख टन स्टॉक होता. म्हणजेच यंदा सरकारला गव्हाची चांगली खरेदी करावी लागेल. नवा माल बाजारात आल्यानंतर मागणीही चांगली राहील. याचाच आधार गव्हाच्या बाजाराला मिळू शकतो.

## बीडच्या सनी आठवले गँगवर मकोका, सहा आरोपिंचा समावेश

**बीड । प्रतिनिधी**

**डिसेंबर महिन्यात गोळीबार करणाऱ्या आठवले गँगवर पोलिसांनी आता मकोका अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. काही दिवसांपूर्वी पोलीस अधिकारी शितल बल्लाळ यांच्यावर आरोप करत ऑडिओ क्लीप व्हायरल करणाऱ्या सनी आठवलेची ही आठवले गँग आहे. बीड पोलिसांनी मागील महिनाभरात जिल्हाभरात दहशत माजविणाऱ्या दोन गँगवर मोक्का अंतर्गत कारवाई केली आहे.**

बीड जिल्ह्याच्या मस्सोजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून हत्या करण्यात आली, या घटनेनंतर बीडसह राज्यात वातावरण चांगलेच तापले आहे. या प्रकरणातील आरोपींवर पोलिसांनी मकोका अंतर्गत कारवाई केली आहे. मंत्री धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय वाल्मिक कराडवर देखील मकोका लावण्यात आला आहे. दरम्यान एकीकडे संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणातील सर्व आरोपींना मकोका लावण्यात आला आहे. तर दुसरीकडे बीडमधील आणखी ६ जणांवर मकोका कारवाई केल्याची माहिती समोर आली आहे. १३ डिसेंबर २०२४ मध्ये पेठ बीड पोलीस ठाणे हद्दीत गोळीबाराची घटना घडली होती.

पान २ वर

## वक्फ विधेयकावर विरोधकांच्या सूचना फेटाळल्या, सत्ताधाऱ्यांच्या मात्र मान्य




**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**बहुचर्चित वक्फ विधेयकातील बदलांना सोमवारी (दि.२७) संसदेच्या संयुक्त समितीने मान्यता दिली. समितीचे अध्यक्ष जगदंबिका पाल यांनी स्पष्ट केले की, अंतिम बैठकीत सर्व ४४ सुधारणांवर चर्चा करण्यात आली. यापैकी एनडीए खासदारांच्या १४ सूधारणांना मान्यता देण्यात आली आहे. विरोधी सदस्यांनीही काही प्रस्ताव मांडले, परंतु मतदानादरम्यान ते फेटाळण्यात आले.**

वक्फ (दुरुस्ती) विधेयकावरील संयुक्त संसदीय समिती अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान आपला अहवाल सादर करणार आहे. संसदेच्या हिवाळी अधिवेशनात समितीचा कार्यकाळ वाढविण्यात आला. वक्फ मालमत्ता नियमित करण्यासाठी बनवण्यात आलेल्या वक्फ कायदा, १९९५ वर गैरव्यवस्थापन, भ्रष्टाचार आणि अतिक्रमण यासारख्या मुद्द्यांवर

पान २ वर

# धनंजय मुंडे यांच्या अडचणी वाढल्या!

## मुख्यमंत्र्यांना भेटून निर्णय घेण्याचे अजित पवारांचे अंजली दमानिया यांना आश्वासन

**मुंबई । प्रतिनिधी**

**ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची सोमवार दि.२७ रोजी संध्याकाळी भेट घेतली. या भेटीदरम्यान अंजली दमानिया यांनी संतोष देशमुख हत्येप्रकरणी तुरुंगात असलेला वाल्मिक कराडविरोधात आणि धनंजय मुंडे व वाल्मिक कराड यांच्या संबंधाबाबत अनेक पुरावे दिले. यानंतर या भेटीवेळी अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी केली. या भेटीनंतर त्यांनी लवकरच याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करेन, असे आश्वासन अजित पवारांनी दिले असल्याचे अंजली दमानिया यांनी सांगितले. यामुळे मंत्री धनंजय मुंडे यांच्या अडचणी वाढल्या आहेत.**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली. या घटनेनंतर राज्यात वातावरण ढवळून निघाले आहे. या प्रकरणी आतापर्यंत सात आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यांच्यावर मकोका अंतर्गत कारवाई केली जात आहे.

पान २ वर



### आज दुपारी मुख्यमंत्र्यांना भेटून कागदपत्र दाखवणार, अजित पवारांचे आश्वासन

मला खात्री आहे की जनभावना आहे, आक्रोश आहे, जे कृत्य झाले ते फारच निर्घृण होते. त्यामुळेच आपण हा लढा देत आहोत. हे देखील मी अजित पवारांना सांगितले असल्याचे दमानिया म्हणाल्या. संतोष देशमुख यांच्यासोबत झालेले कृत्य यापुढे कधीही होऊ नये, असे महाराष्ट्रात घडू नये, त्यामुळेच धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेणे आवश्यक आहे. हे सांगितल्या नंतर मंगळवारी दुपारी मुख्यमंत्र्यांना भेटून हे सर्व कागदपत्र दाखवू आणि योग्य तो निर्णय घेऊ'', असे पवार म्हणाल्याचे दमानिया यांनी सांगितले.

### धनंजय मुंडे – राजश्री मुंडे आणि वाल्मिक कराड यांच्या आपसातील संबंधाचे दिले पुरावे

अंजली दमानिया म्हणाल्या, ''मी २५ ते ३० मिनिटे त्यांना भेटले. हे माणुसकीला काळिमा फासण्याचे कृत्य आहे, असे त्यांनी मला सांगितले. मग त्यावर मी त्यांना तुम्ही राजीनामा का घेत नाहीत, असे विचारले. मी त्यांना सर्व पुरावे दिले. त्यांना धनंजय मुंडे, राजश्री मुंडे आणि वाल्मिक कराड यांचे एकत्र बिझनेस कसे आहेत? त्यांच्या कंपनीत आर्थिक नफा कसा मिळतो? ऑफिस ऑफ प्रॉपर्टीमध्ये हे सर्व कसे बसतेय? त्यामुळेच तुम्ही कोणत्याही परिस्थितीत राजीनामा घ्यायला हवा याबद्दलचे सर्व पुरावे दिले'', असे अंजली दमानिया म्हणाल्या.

### जितेंद्र आव्हाड यांचा पुन्हा धमाका



बीड : सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड आणि प्रशासनाच्या लागेबंधाची रोज नवीन माहिती समोर येत आहे. आताही आमदार जितेंद्र आव्हाड यांनी त्यासंबंधी सोशल मीडियावरून सनसणाटी आरोप केले आहेत. बीडच्या कारागृहात असलेल्या वाल्मिक कडाच्या दिमतीला सात पोलिस हवालदार असल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच कराडच्या गँगमधील छोटे-मोठे गुन्हेगार तुरुंगातही जमले असून त्यांची रोज मैफील जमत असल्याचा आरोपही आव्हाडांनी केला.

## निलंबीत वाहकाची आत्महत्या

बीड: राज्य परिवहन महामंडळाच्या माजलगाव आगारात वाहक म्हणून कार्यरत असलेले चिंचाळा येथील दत्ता अंबलकर या वाहकाने २६ जानेवारीच्या मध्यरात्री शेतातील लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. एका प्रवाशाने

पान २ वर

# संपादक गणेश मोकाशे मूकनायक पुरस्काराने सन्मानित

## खा.बजरंग सोनवणे, सांगोल्याचे आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या हस्ते गौरव



**माजलगाव । प्रतिनिधी**

**गेल्या चार वर्षापासून जनतेच्या पसंतीस उतरलेल्या दैनिक राज्य लोकतंत्रचे संपादक गणेश मोकाशे यांच्या पत्रकारितेतील कार्याची दखल घेऊन माजलगाव येथील एकता पत्रकार संघाने मूकनायक पुरस्कार जाहीर केला. दिनांक २७ जानेवारी रोजी बीड चे खासदार बजरंग सोनवणे आणि सांगोल्याचे आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या हस्ते मूकनायक पुरस्कार संपादक गणेश मोकाशे यांना प्रदान करण्यात आला.**

शेतकरी हा केंद्रबिंदू म्हणून गेल्या चार वर्षांपूर्वी बीड आणि पुणे येथे संपादक गणेश मोकाशे यांनी दैनिक राज्य लोकतंत्र सुरू केले. शेतीबरोबरच सामाजिक आणि इतर क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट असे लिखाण करून समाजाला योग्य अशी दिशा मिळावी यासाठी प्रयत्न

पान २ वर

## पत्रकार बंडू खांडेकर यांचा मूकनायक पुरस्काराने गौरव



**दिंद्रुड । प्रतिनिधी**

संपादक तथा जेष्ठ पत्रकार बंडूजी खांडेकर यांना त्यांच्या पत्रकारितेतील महत्त्वपूर्ण योगदानासाठी एकता पत्रकार संघाच्या वतीने मूकनायक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. माजलगाव येथील वैष्णवी मंगल कार्यालयात संपन्न झालेल्या दिमाखदार सोहळ्यात संगोल्याचे आमदार भाई डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते यथोचित गौरव करुन त्यांना मूकनायक पुरस्कार बहाल करण्यात आला.

सांगोल्याचे आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख, खा. बजरंग सोनवणे, छत्रपती सह.साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन

पान २ वर

### पुरस्कार मित्राला समर्पित

रुग्णसेवा हीच ईश्वर सेवा हे ब्रीद घेऊन राज्यभरातील आरोग्यसेवेचा वसा देवदूत डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी घेतला आहे. त्यांच्या माध्यमातून केलेल्या कामाची पावती म्हणून मिळालेला हा मूकनायक पुरस्कार आपण मित्रवर्य डॉ.शेटे यांना समर्पित करत असल्याचे बंडू खांडेकर म्हणाले. आपल्याला मिळालेला प्रतिष्ठेचा पुरस्कार जिवलग मित्राला बहाल करुन खांडेकर यांनी मैत्रीच्या नात्याची वीण किती घट्ट असू शकते याची प्रचिती दिली आहे.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२७ जानेवारी २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १.५० क्विंटल | २,७६० | २,७६० | २,७६० |
| ज्वारी/हायब्रिड: ५६.५० क्विंटल | १,७५० | २,८०० | २,२१२ |
| मका/लोकल: ०.५० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : १२२.०० क्विंटल | ५,९०० | ६,९८० | ६,७९७ |
| उडीद : १.५० क्विंटल | ६,३०० | ६,३०० | ६,३०० |
| बाजरी: ५.५० क्विंटल | २,९०० | ३,०४० | २,९७० |
| मुग : ०.५० क्विंटल | ७,२५० | ७,२५० | ७,२५० |
| सोयाबीन: ८४.०० क्विंटल | ३,८५० | ४,८५० | ४,०९० |
| हरभरा: १७९.५० क्विंटल | ३,९५० | ४,१०१ | ४,०६३ |

# एसटीची १५ टक्के भाडेवाढ अन्यायकारक

## विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या नेतृत्वात आंदोलन

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर येथील मध्यवर्ती एसटी स्थानकांवर अंबादास दानवे यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी चक्का जाम आंदोलन करण्यात आले. एसटीची वाढलेली भाडेवाढ रद्द करण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले. यावेळी अंबादास दानवे यांनी एसटी महामंडळाच्या निर्णयासह राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे नाव न घेता त्यांच्यावर टीका केली.**



राज्य परिवहन प्राधिकरणाच्या

पान २ वर

### उबाठा शिवसेनेचे आज राज्यभर आंदोलन

मंगळवार दि.२८ जानेवारी रोजी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण राज्यभरात एसटीच्या भाडेवाढीविरोधात आंदोलन होणार असल्याचे, उद्धव ठाकरेंकडून जाहीर करण्यात आले आहे. भाडेवाढी ही कधीच १५ टक्के होत नाही. २ ते ३ टक्के होते. एसटीचे अध्यक्ष सांगतात की एसटी नफ्यात आहे. पण हे सरकार इतर ठिकाणी पैसे वाटते, प्रलोभन दाखवतात. मग एसटीने काय केले आहे. यासाठी आंदोलन करण्यात येणार आहे.

# शेतकऱ्यांची कनिष्ठ अभियंता, कालवा निरीक्षकांना शिवीगाळ

## नऊ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी पोलीस स्टेशन हद्दीतील लिंबोडी येथील शेतकऱ्यांनी कडा मध्यम प्रकल्प लाभधारक शेतकऱ्यांना पाणी का सोडता ? या कारणावरून लघुपाटबंधारे विभागातील कनिष्ठ अभियंता आणि काला निरीक्षक आणि इतर कर्मचाऱ्यांना शिवीगाळ करून कामात अडथळा आणला आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याने लिंबोडी येथील शेतकऱ्यांच्या विरोधात आष्टी पोलिसांनी येथे गुन्हा दाखल झाला आहे याविषयीचे सविस्तर वृत्त असे की दिनांक २५ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता लिंबोडी येथील कडा मध्यम प्रकल्पाच्या मुख्य कालव्यातून लाभधारक शेतकऱ्यांसाठी प्रभावी सिंचनासाठी

पान २ वर

cmyk



अग्रलेख

# भारताचा गर्भित दम इशारा देणाराच

काश्मीर हा भारताचा मुकुटमणी आहे आणि पीओकेशिवाय ते अपूर्ण आहे, असे राजनाथ सिंह यांनी म्हटले आहे. राजनाथ सिंह यांचे हे विधान फेब्रुवारी १९९४ च्या संसदेच्या ठरावानुसार आहे. यामध्ये पाकिस्तानने आक्रमण करून ताब्यात घेतलेला जम्मू आणि काश्मीर राज्याचा भाग रिकामा करण्याची मागणी केली होती. यावेळी राजनाथ सिंह यांनी १९६५ च्या युद्धाचाही उल्लेख केला. या युद्धामध्ये जम्मू-काश्मीरच्या लोकांनी ना पाकिस्तानला पाठिंबा दिला ना दहशतवादाला याची आठवण त्यांनी करून दिली. संरक्षणमंत्र्यांचे हे विधान अनेकार्थांनी महत्त्वाचे आहे. या माध्यमातून त्यांनी काश्मीरमधील जनतेच्या वेदनांवर फुंकर घालण्याचाही प्रयत्न केला आहे.

गेल्या काही वर्षांमध्ये या भागात दहशतवादविरोधी मोहीम तीव्र करण्यात आली आहे. परंतु भारतीय लष्कराकडून होणाऱ्या कारवाया या प्रदेशाला आणि देशाला दहशतवाद्यांपासून वाचवण्यासाठी आहेत. काश्मीरच्या विकासासाठी त्या आवश्यक आहेत, हा संदेश त्यांनी या माध्यमातून दिला आहे. याचे कारण अलीकडील काळात लष्कराच्या कारवायांबाबत वेळोवेळी प्रश्न उपस्थित होताना दिसले आहेत. त्याअनुषंगाने हे विधान करणेही गरजेचे होते. आता अखनूरमध्ये त्यांनी पीओके हा भारताचा अविभाज्य भाग असून लवकरच तो ताब्यात घेतला जाईल, असे विधान केले आहे.


१९९४ मध्ये संसदेने पाकव्याप्त काश्मीरसंदर्भात प्रस्ताव संमत केल्यानंतर आजतागायत तो भाग आणि दुर्लक्षित गिलगिट बाल्टिस्तानसंदर्भात भारताचे हक्क तपशीलाने प्रतिपादन करणारा दस्तावेज नाही. त्यामुळे भारताने पाकव्याप्त काश्मीर आणि विशेषत: गिलगिट बाल्टिस्तानसंदर्भात 'श्वेतपत्रिका' काढणे गरजेचे आहे. भारताला कधी तरी पाकव्याप्त काश्मीर भारतात सामील होईल, अशी अपेक्षा असल्यामुळे जम्मू आणि काश्मीरमधील विधानसभेत काही जागा राखून ठेवल्या आहेत. पाकव्याप्त काश्मीरमधील लोकसंख्या ही ४०-५० लाख आहे. तेथील जनता स्वतःहून भारतात येईल का, तर याचे उत्तर 'नाही' आहे. कारण पाकिस्तानचे सैन्य त्यांना कधीही वेगळे होऊ देणार नाही. जर त्यांना भारतात यायचे असेल तर त्यांना स्वतःहून उठाव करावा लागणार आहे आणि मग त्यांना भारतात यावे लागेल. तथापि, पाकिस्तानने या भागाचा गैरवापर करत तेथील दहशतवाद्यांच्या तळांवरून काश्मीरमध्ये हिंसाचार पसरवण्याचे प्रयत्न थांबवले नाहीत तर भारत पुन्हा एकदा पाकिस्तानला दणका देऊ शकते. संरक्षणमंत्र्यांनी ही बाब स्पष्ट केल्यामुळे पाकिस्तानकडून होणाऱ्या कारवायांना काहीसा पायबंद बसू शकेल. भारताला कोणत्याही प्रकारचा संघर्ष टाळायचा आहे. भारताचे वैशिष्ट्य असे आहे की, जगातील कोणत्याही देशावर आजवर भारताने हल्ला केलेला नाही किंवा कोणत्याही देशाचा एक इंचही प्रदेश ताब्यात घेतलेला नाही. ही भूमिका भारताच्या संरक्षण धोरणाचा आणि परराष्ट्र धोरणाचा आधार आहे. पण पाकव्याप्त काश्मीर हा भारताचाच भाग आहे. त्यामुळे या भागात केलेल्या कारवाया या परराष्ट्रावरील हल्ला या श्रेणीत येत नाहीत. हीच बाब संरक्षणमंत्र्यांनी यापूर्वीही स्पष्ट केलेली आहे.

# जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी राज्य शासन कटीबध्द-पालकमंत्री पंकजा मुंडे

जालना । प्रतिनिधी

**स्वातंत्र्य हा आपला अधिकार तर प्रजासत्ताक हा आपला अलंकार आहे. जालना जिल्ह्यात भाईचारा व संविधानाला सन्मान देणारा वर्ग उदयास यावा अशी आशा व्यक्त करते. तसेच जालना जिल्ह्यातील शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांच्या प्रगतीकरीता तसेच जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी राज्य शासन कटीबध्द राहिल, असे प्रतिपादन राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती पंकजा प्रज्ञा गोपीनाथ मुंडे यांनी केले.**

भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या वर्धापन दिनानिमित्त जालना येथील पोलीस मुख्यालय मैदानावर श्रीमती मुंडे यांच्या हस्ते आज मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्यात आले, त्यावेळी त्या बोलत होत्या. याप्रसंगी खासदार डॉ. कल्याण काळे, आमदार बबनराव लोणीकर, आमदार अर्जुन खोतकर, आमदार नारायण कुचे, आमदार संतोष दानवे, आमदार हिकमत उढाण, आमदार राजेश राठोड, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मीना, जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल आदींसह स्वातंत्र्य सैनिक, लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी, पत्रकार व नागरिक, विद्यार्थी उपस्थित होते. पालकमंत्री श्रीमती मुंडे म्हणाल्या की, लोकशाही प्रणालीचा दीपस्तंभ ठरलेली भारतीय राज्यघटना राष्ट्राला अर्पण करण्यात आल्याने जगामध्ये भारत देश एक प्रजासत्ताक गणराज्य म्हणून उदयास आले. लोकशाही तंत्राने घटनेनुसार देशाचा कारभार सुरु झाला. नागरिकांना राज्यकारभारात सहभागी होण्याचा अधिकार मिळाल्याने या दिवसाला विशेष महत्व आहे. भारतीय घटना समितीच्या मसुदा समितीचे अध्यक्ष भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान निर्मितीमध्ये अमुल्य योगदान राहिले. त्यामुळेच जगात भारतीय लोकशाही श्रेष्ठ ठरली आहे. आपला जालना जिल्हा विकासाभिमुख जिल्हा म्हणून ओळखला जातो. विविध योजनांच्या यशस्वी अंमलबजावणीमुळे विविध क्षेत्रात सतत अग्रेसर राहिला आहे, त्याचा मला जिल्ह्याची पालकमंत्री म्हणून अतिशय आनंद आणि अभिमान आहे. राज्य शासनाने सर्वसामान्य जनतेसाठी काही महत्वकांक्षी योजना सुरु केल्या आहेत. यामध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना, मुख्यमंत्री वयोश्री योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना, मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज पुरवठा योजना, मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना आणि मुलींना मोफत उच्च शिक्षण योजना या योजनांचा समावेश आहे. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' अंतर्गत जालना जिल्ह्यात ५ लाख २५ हजार पात्र महिलांना या योजनेअंतर्गत प्रति महा १ हजार ५०० लाभ देण्यात येत आहेत. तसेच राज्यातील ६५ वर्ष व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सामान्य स्थितीत जगण्यासाठी 'मुख्यमंत्री वयोश्री योजना' सुरु करण्यात आली आहे. त्याअंतर्गत जिल्ह्यात २ हजाराहून अधिक अर्ज प्राप्त असून, त्यातील ४६८ जेष्ठ नागरिकांचे अर्ज पात्र ठरले आहेत. राज्यातील युवकांना शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देवून त्यांची नौकरी मिळण्याची क्षमता वाढविण्यासाठी 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' सुरु करण्यात आली असुन आतापर्यंत १ हजार ६६५ बेरोजगार युवकांची शिकाऊ प्रशिक्षणार्थी म्हणुन निवड करण्यात आलेली आहे. तसेच राज्यातील ६० वर्षांवरील जेष्ठ नागरिकांना भारतातील तीर्थयात्रांना भेट देण्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी शासनाने 'मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना' सुरु केली आहे. या योजनेअंतर्गत अर्ज स्विकारुन योग्य कार्यवाही सुरु आहे. 'मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज पुरवठा योजना' अंतर्गत शेतकऱ्यांवर




येणाऱ्या वीज बिलाचा भार कमी करणे हा आहे. या योजनेअंतर्गत जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या ७.५ हॉर्सपावर क्षमतेच्या शेती पंपाना मोफत वीज पुरवठा केला जाणार आहे. तसेच राज्यातील मुलींना बारावी नंतर उच्च शिक्षणासाठी मोफत शिक्षण देण्याची योजना सुरु केली असुन, यामध्ये शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्कामध्ये १०० टक्के लाभ देण्यात येत आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आणि राज्याचे नाव देशात अग्रेसर ठेवण्यासाठी राज्य शासनाच्या प्रत्येक विभागाचा १०० दिवसांचा कृती आराखडा तयार करून, ठोस कामगिरी करण्याचा निर्णय घेतला आहे. या आराखड्यात लोककेंद्रित व तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जनतेला लाभ मिळणाऱ्या योजना आदींचा समावेश असणार आहे. राष्ट्रीय पशुधन अभियान अंतर्गत कुक्कुट पालनाचे २ प्रकल्प पूर्णत्वास येत असून, शेळी-मेंढी पालनाचे ४ प्रकल्प जिल्ह्यात कार्यान्वित होण्याच्या मार्गावर आहेत. या अंतर्गत जिल्हा उद्योजक, रोजगार आणि उत्पादन निर्मिती होण्यास मदत होणार आहे. जिल्ह्यातील अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व पशुपालक उद्योजकांना केंद्रस्थानी ठेवून स्पर्धात्मक व सर्वसमावेक्षक पशुसंवर्धन मूल्यसाखळी विकसित करण्यासाठी बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट) अंतर्गत ६ प्रकल्प आपल्या जिल्ह्यासाठी प्रस्तावित करण्यात आले आहेत. केंद्र सरकारच्या महत्वकांक्षी ॲग्रीस्टॅक योजनेअंतर्गत महाराष्ट्र सरकारने राज्यातील सर्व शेतकऱ्यांचा ओळख क्रमांक तयार करण्यात येत आहे. या शेतकरी ओळख क्रमांकाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळणार आहे. जिल्ह्यातील धनगर व तत्सम जमातीतील मेंढी पालन करणाऱ्या घटकांना प्रोत्साहन देण्यासाठी राजे यशवंतराव होळकर महामेष योजनेअंतर्गत २७३ लाभार्थ्यांना विविध १८ उपघटकातंर्गत लाभ देण्यात येणार आहे. शेतीपूरक व्यवसायामध्ये दुग्ध व्यवसाय, शेळी-मेंढी पालनाकरीता तसेच मराठवाडा पॅकेजअंतर्गत गाय, म्हैस, शेळी गटासाठी प्रत्येकी १ हजार लाभार्थ्यांसाठी ५० टक्के अनुदानावर विशेष योजना राबविण्यात येत आहे. जिल्ह्यात २१ व्या पशुगणनेला २५ नोव्हेंबरपासून प्रारंभ झाला असून, याकरीता १६० प्रगणक व १ पर्यवेक्षक सदर काम पूर्णत्वास नेत आहेत. स्टील व सीडस उद्योगामुळे आपला जिल्हा ओळखला जातो. यापुढे सिल्क अर्थात रेशीम शेती व त्यावरील प्रक्रिया उद्योगामुळे जिल्ह्याची नवीन ओळख निर्माण होत आहे. नवीन तुती लागवड करुन, जालना जिल्हा राज्यात प्रथम क्रमांकावर आहे. जालना येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे ॲटोमॅटीक रिलींग मशीनचीही उभारणी करण्यात आली असून, याद्वारे उत्कृष्ट दर्जाचे रेशीम सुताची निर्मिती करण्यात येत आहे. यामुळे अनेक बेरोजगारांना रोजगार उपलब्ध झाला आहे. रेशीम सूत उत्पादनाची पुढील प्रक्रीया जसे हातमागावर कापड बनविण्याचे काम लवकरच जालना येथे सुरु करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. बालविवाह रोखण्यासाठी मागील कालावधीत जिल्ह्यात चांगले काम झाले आहे. जिल्ह्यात मागील वर्षात १३७ बाल विवाह रोखण्यात महिला व बालविकास विभागाला यश आले आहे. क्रीडा विभागाच्यावतीने विकसीत करण्यात येत असलेल्या जिल्हा क्रीडा संकुलाच्या पहिल्या टप्प्यातील विकासकामाचे नुकतेच लोकार्पण करण्यात आले असुन दुसऱ्या टप्प्यातील विकासकामे प्रगतीपथावर आहेत. तसेच जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी अत्याधुनिक सुविधा असलेले तालूका क्रीडा संकुल विकसीत करण्यात येत आहे. तसेच ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींसाठी शासकीय वसतिगृह योजनेतंर्गत जालना जिल्ह्यासाठी १२ नवीन वसतिगृहे मंजूर झाली असून , यापैकी ८ वसतिगृहे सुरु झाली आहेत. कायदा व सुव्यवस्था, सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्वाच्या ठिकाणी जिल्हा नियोजनच्या निधीतून जालना शहरात ९० सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहे. यामुळे पोलिस विभागाला गुन्हेगारी रोखण्यास मदत होणार आहे. जालना महानगर पालिका क्षेत्रातील नगर भूमापन झालेल्या क्षेत्रातील मिळकत पत्रिकासंदर्भात जनतेच्या तक्रारी वाढत आहेत. अशा स्वरुपाच्या तक्रारीवर तात्काळ कार्यवाही करण्यासाठी तसेच यापुढे अशा तक्रारी प्राप्त होवू नये याकरीता जिल्हाधिकारी यांच्या संकल्पनेतून जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख यांनी 'जालना महानगर पालिका क्षेत्रातील नगर भुमापन मिळकतींचे जी.आय.एस. आधारीत सर्व्हेक्षण' सुरु केले आहे. या कार्यक्रमास 'पवित्र' असे नाव देण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून नगर भूमापन क्षेत्रातील प्रत्येक मिळकतीस अक्षांस व रेखांश मिळणार आहेत. यामुळे भविष्यात मिळकतीच्या हद्दी संदर्भात वाद उत्पन्न होणार नाहीत, तसेच बिनशेती भुखंडाच्या मालकी हक्कांचे संरक्षण होणार आहे. असेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी पालकमंत्री श्रीमती मुंडे यांच्या हस्ते जालना जिल्ह्यातील गौरवास्पद कामगिरी केलेल्या अधिकारी, कर्मचारी, खेळाडू, गुणवंत मार्गदर्शक, गर्भलिंग निदान प्रतिबंधक समिती पथक यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी पालकमंत्री श्रीमती मुंडे यांनी स्वातंत्र्य सैनिक, लोकप्रतिनिधी, मान्यवर व नागरिकांची भेट घेत त्यांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. प्रारंभी पालकमंत्री श्रीमती मुंडे यांचे हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण झाले. यानंतर पालकमंत्री यांनी पोलीस परेडचे निरीक्षण केले. यावेळी पोलीस, होमगार्ड, सैनिक शाळेचे विद्यार्थी, एनसीसीच्या विद्यार्थ्यी यांची मानवंदना स्विकारली सलामी देण्यात आली. विविध विभागांनी चित्ररथाद्वारे योजनांचे सादरीकरण केले. शेवटी पोलिस विभागाने सायबर फ्रॉड जनजागृतीपर पथनाट्य सादर केले. तसेच शालेय विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांवर सुंदर नृत्याचे सादरीकरण केले.

# महाराणी ताराबाई विद्यालय व प्रमोद महाजन इंग्लिश स्कूलमध्ये प्रजासत्ताक साजरा

वडवणी । प्रतिनिधी

**वडवणी येथील,शैक्षणिक क्षेत्रात नावलौकिक असलेल्या महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय आणि प्रमोद महाजन इंग्लिश स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने ७६ वा भारतीय प्रजासत्ताक दिन समारंभानिमित्त दि.२६ जानेवारी २०२५ रविवार रोजी विद्यालयाच्या प्रांगणामध्ये ध्वजारोहण सोहळ्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.**



आरएसपी व स्काऊट गाईडच्या पथकाने मान्यवरांना मानवंदना दिल्यानंतर ध्वजारोहण सोहळ्याच्या कार्यक्रमाला प्रारंभ झाला संस्कार शिक्षण मंडळाचे संस्थापक,सचिव तथा चौसाळा विधानसभा मतदारसंघाचे मा.आ.केशवराव आंधळे यांच्या शुभहस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी व संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून राष्ट्रीय तिरंगा ध्वजाचं ध्वजारोहण करण्यात आले राष्ट्रगीत,राज्य गीत गायन व संविधान उद्देशिकेचे वाचन केल्यानंतर महाराणी ताराबाई मा.व उच्च माध्यमिक विद्यालय व प्रमोद महाजन इंग्लिश स्कूलच्या यांच्या संयुक्तरीत्या प्रजासत्ताक दिनानिमित्त सांस्कृतिक व सत्कार सोहळ्याचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा.आ.केशवराव आंधळे तर प्रमुख अतिथी म्हणून वडवणी पं.स.मा.स.सौ.सुलोचना आंधळे मॅडम,कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती अनिलजी चोले,ह.भ.प.अर्जुन महाराज खाडे ,ह.भ.प.आचार्य विठ्ठल महाराज शास्त्री,सेवानिवृत्त मुख्याध्यापक मधुकरजी धस,महाराणी ताराबाई विद्यालयाच्या शालेय समितीचे अध्यक्ष तथा युवा नेते संजयभाऊ आंधळे,वडवणी कृ.उ.बा.समितीचे संचालक पांडुरंगजी अंडील तसेच वडवणी कृ.उ.बा.समितीचे युवा संचालक तथा उद्योजक रणजीतभैय्या धस, संस्थेचे संचालक इंजि.अशोकभैय्या आंधळे, बालरोग तज्ञ डॉ.श्रीगुरुदत्त महादर, डॉ.नेहरकर, पत्रकार लांडे, विद्यालयाचे प्राचार्य राऊत सर आदींच्या उपस्थितीमध्ये सांस्कृतिक कार्यक्रमाला प्रारंभ झाला. एमसीआय परीक्षेत घवघवीत यश संपादन केल्याबद्दल डॉ.वैभव रामनाथजी डोईफोडे यांचा तसेच त्याची आई सौ.शोभा डोईफोडे मॅडम व वडील श्री.रामनाथजी डोईफोडे सर यांचा कार्यक्रमाचे अध्यक्ष व मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रमाला प्रारंभ झाला वक्तृत्व,देशभक्तीपर गीत व गीतावर नृत्य विद्यार्थ्यांनी सादर केले त्यांच्या या कलागुणांना मान्यवरांनी व उपस्थित विद्यार्थ्यांनी टाळ्या वाजवून दात दिली. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने सामाजिक,राजकीय,शैक्षणिक,अध्यात्मिक क्षेत्रातील नामांकित व्यक्ती तसेच मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक उपप्राचार्य मस्के सर यांनी केले तर सूत्रसंचालन सौ.प्रियंका कुरकुटे मॅडम यांनी केले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील व इंग्लिश स्कूल मधील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# जिल्ह्याला पहिलीच महिला पालकमंत्री मिळाल्याने जिल्ह्याचा विकास होणार-आ.बबनराव लोणीकर

जालना । प्रतिनिधी

**जालना जिल्ह्यामध्ये आज पर्यंत पालकमंत्री स्थान दिले नव्हते परंतु आता जिल्ह्याची पालकमंत्री एक महिला म्हणून पंकजा गोपीनाथ मुंडे यांना आता जिल्ह्याची पालकमंत्री म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे यामुळे जिल्ह्यामध्ये महिला मध्ये आनंदाचे वातावरण पसरला आहे.**



भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल तथा पशुसंवर्धन मंत्री नामदार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांचे जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री म्हणून निवड झाल्या पासून प्रथमच आगमन झाले यावेळी पंकजा मुंडे यांनी भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा माजी मंत्री आ. बबनराव लोणीकर यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली यावेळी आमदार श्री नारायण कुचे यांची उपस्थिती होती तसेच कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड मोठा उत्साह यावेळी दिसून आला. स्व.गोपीनाथराव मुंडे यांचा वसा आणि वारसा चालवणाऱ्या पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांना जालना जिल्ह्याचे पालकमंत्री पद मिळाल्यामुळे या पंचवार्षिक मध्ये निश्चितपणे जालना जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न होतील पंकजाताईंच्या रुपाने कर्तबगार पालकमंत्री मिळाल्या त्यामुळे जालना जिल्ह्याचा विकासाचा संपूर्ण अनुशेष भरून काढण्याचं काम त्यांच्या माध्यमातून निश्चितपणे होईल सर्वांना योग्य तो न्याय मिळेल असे मत माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केले. आ. बबनराव लोणीकर यांच्या जालना येथील निवासस्थानी पंकजाताई मुंडे यांनी सदिच्छा भेट दिली यावेळी भाजपा महाराष्ट्र प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांनी पंकजाताई मुंडे यांचे स्वागत केले. यावेळी लोकप्रतिनिधी पक्ष पदाधिकारी कार्यकर्ते माता-भगिनी तथा युवकांमध्ये प्रचंड उत्साह व जल्लोषाचे वातावरण दिसून आले. यावेळी फटाक्यांच्या आतिषबाजी सह अत्यंत जल्लोषाच्या वातावरणात पंकजा मुंडे यांचे स्वागत करण्यात आले यावेळी आमदार बबनराव लोणीकर, आमदार नारायण कुचे, भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर भाऊसाहेब कदम सतीशराव निर्वळ शत्रुघ्न कणसे रमेश भापकर यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# कृत्रिम बुद्धिमत्ता एआय विद्यापिठास मुक्ता साळवेंचे नाव द्या-विष्णु पाटोळे

वडवणी । प्रतिनिधि

**देशामध्ये होत असलेले पहीले कृत्रिम बुद्धिमत्ता (ए.आय) विद्यापीठ स्थापन होत आसुन ते महाराष्ट्र राज्यामध्ये होत आहे त्या विद्यापीठाला भारत देण्यामध्ये महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांनी सुरू केलेल्या शाळेची पहीली वीद्यार्थीनी आसलेल्या मुक्ता साळवे यांचे नाव देण्यात यावे.**

देशामध्ये नव्याने होत असलेल्या कृत्रिम बुद्धिमत्ता (ए.आय ) या महाराष्ट्रातील होउ घातलेल्या विद्यापीठाला सावित्रीबाई व जोतिबा फुले यांनी पुण्यात भारतातील पहिली मुलींसाठी शाळा सुरु केली त्या शाळेची पहीली विद्यार्थीनी मुक्ता साळवे यांचे नामकरण करावे असे एका दिलेल्या प्रसिद्धि पंत पत्रकात विष्णु पाटोळे यांनी म्हटले आहे.कृत्रिम बुद्धिमत्ता विध्यपिठ असे नाव देवुन ते विद्यापीठ पुणे जिल्ह्यातील पुरंदर जवळ त्यांच्या पेठ गावी स्थापन करुन मुक्ता साळवे यांचा सन्मान करावा असेही विष्णू पाटोळे यांनी म्हटले आहे. मुक्ता साळवे यांचा जन्म पुणे जिल्ह्यातील पेठ या गावात झाला व फुले दांमपत्यानी पुणे येथे शनिवार वाडा येथे देशातील पहिली मुलींची शाळा सुरू केली त्या शाळेची पहिली विद्यार्थीनी मुक्ता साळवे ह्या होत्या. म्हणून मुक्ता साळवे यांचे विद्यापीठाला नाव देवुन महाराष्ट्र शासनाने त्यांच्या नावाचा सन्मान करावा. या देशामध्ये पूर्वीपासूनच जातीयतेच्या भावना समाजामध्ये व राजकारण्यामध्ये रुजलेली आहे म्हणून तर देशासाठी किंवा समाजासाठी असे महान कार्य करणाऱ्या या समाजाला त्यांचे नाव देशपातळीवर उंचविण्यास आतापर्यंतच्या सरकारने त्यांची दखल घेतली नाही. म्हणून परीणामी देशाच्या राष्ट्रीय पुरुषांच्या यादीमध्ये थोर देशभक्त राष्ट्रपिता शिक्षणाचे जनक रक्षक असंख्य क्रांतिकारकांचे गुरू क्रांतीविर लहुजी साळवे, स्वतंत्र नायक विर फकीरा साठे, स्त्री शिक्षणातील पहिली विद्यार्थीनी मुक्ता साळवे होय! फक्त दिड दिवस शाळेत जावुन असे अजरामर साहित्याचे जनक आण्णाभाऊ साठे, राष्ट्रमाता जिजाऊ,छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याचे पहीले शिल्लेदार येल्याजी गोठे (येल्या मांग) असे विर समाजसुधारक हे आजपर्यंत राजकारण्यांनी जातीयतेच्या विचारामुळे हे राष्ट्र पुरुषांच्या यादी पासुन वंचित राहीले आहेत. यांना इथला जातीवादी म्हणून न पाहता त्यांचे कार्याचा गौरव म्हणून त्याचे नाव राष्ट्र पुरुषांच्या यादीत घेऊन त्यांच्या नावाने विद्यापीठ स्थापन करून यांचा गौरव केला पाहिजे. त्यांच्या कार्याचा सन्मान केला पाहिजे, मुंबई वद्यापिठास साहित्य रत्न आण्णाभाऊ साठे यांचे नाव दिले पाहिजे, आण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न व नोबेल पुरस्कार मिळाला पाहिजे, लहुजी यांच्या नावाने प्रत्येक राज्यात सैनिक विद्यापीठ स्थापन करावे, जे तरुण देश रक्षण करण्यासाठी भरती होतात ते लहुजी साळवे सैनिक विद्यापीठातुन देश पातळीवर रक्षणासाठी गेले पाहिजेत, व नव्याने होउ घातलेल्या कृत्रिम बुद्धिमत्ता(ए.आय)विद्यापीठाला विद्यार्थीनी मुक्ता साळवे यांचे नाव देण्यात यावे अशा विविध प्रकारच्या मागण्यासाठी लवकरच एक शिष्टमंडळ राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आजीत पवार, राज्यचे मंत्री आशिष शेलार, व चंद्रकांत पाटील यांची भेट घेणार असल्याचे विष्णू पाटोळे व त्यांच्या सहका-यांनी म्हटले आहे. यावेळी लक्ष्मण कस्बे, दिलीप आवचर, मिलिंद पाटोळे, सह आदी उपस्थित होते.लवकरच एक शिष्टमंडळ मुख्यमंत्री यांच्यासह त्या खात्याच्या मंत्र्यांना भेटणार आहे.

## पान १ वरून...

### वक्फ विधेयकावर विरोधकांच्या सूचना

टीका झाली आहे. जेपीसीचे अध्यक्ष जगदंबिका पाल यांनी बैठकीनंतर सांगितले की, समितीने स्वीकारलेल्या सुधारणांमुळे कायदा अधिक चांगला आणि प्रभावी होईल. विरोधी पक्षाच्या खासदारांनी बैठकीच्या कामकाजाचा निषेध केला आणि पाल यांच्यावर लोकशाही प्रक्रिया उलथवून टाकल्याचा आरोप केला. टीएमसी खासदार कल्याण बॅनर्जी म्हणाले की, बैठकांचा हा दौरा हास्यास्पद होता. आमचा आवाज ऐकू आला नाही. पाल यांनी हुकूमशाही पद्धतीने काम केले आहे. दरम्यान, २४ जानेवारी रोजी दिल्लीत झालेल्या जेपीसी बैठकीत विरोधी सदस्यांनी गोंधळ घातला होता. जेपीसीमध्ये गोंधळ झाल्यानंतर १० सदस्यांना निलंबित करण्यात आले होते. मसुद्यातील प्रस्तावित बदलांचा अभ्यास करण्यासाठी त्यांना पुरेसा वेळ देण्यात आला नसल्याचा त्यांचा दावा होता. दिल्ली निवडणुकीमुळे भाजप वक्फ दुरुस्ती विधेयकावरील अहवाल संसदेत लवकर सादर करण्याचा आग्रह धरत असल्याचा आरोपही विरोधी पक्षाचे सदस्य करत आहेत.

----------

### गव्हाच्या बाजाराला

बाजारातील पाईपालाईनही खाली आहे. देशात गव्हाचा पुरेसा पुरवठा सुरळीत होण्यासाठी केवळ यंदा उत्पादन वाढून फायदा नाही. तर किमान दोन वर्षे तरी विक्रमी उत्पादन घ्यावे लागेल. तेव्हा कुठे सरकारचा स्टॉक आणि बाजारातील पुरवठा सुरुळीत होईल. केवळ यंदाच उत्पादन वाढून भागणार नाही. त्यामुळे यंदाही गहू बाजाराला तेजीची हवा मिळेल, असा अंदाज आहे. देशात गव्हाचा पुरवठा कमी असल्याने सरकार खुल्या बाजारात गव्हाची विक्री करत असूनही गव्हाच्या भावात मागील महिनाभरात ३ टक्क्यांची वाढ झाली. गव्हाचा भाव देशभरात सरासरी ३२०० ते ३३०० रुपयांवर पोहचला. गव्हाची बाजारात आवक सुरु झाल्यानंतर भाव कमी होतील. पण चांगल्या मालाचे भाव हमीभावाच्या खाली जाण्याची शक्यता धुसर असल्याचे अभ्यासकांचे म्हणणे आहे.

-----------

### बीडच्या सनी आठवले गँगवर मकोका, सहा

त्यातील सहा आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. त्यात प्रामुख्याने अक्षय आठवले, सनी आठवले, आशिष आठवले, मनीष क्षीरसागर आणि ओंकार सवई यांचा समावेश आहे. या आरोपींनी आतापर्यंत १९ गंभीर स्वरूपाचे गुन्हे केल्याची पोलीस दफ्तरी नोंद आहे. या संपूर्ण गुन्ह्याचा तपास केल्यानंतर आता आठवले गँगवर मकोका कारवाई करण्यात आली आहे. काही दिवसांपूर्वी पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ आणि सनी आठवले याची कथित ऑडिओ क्लिप वायरल झाली होती. याच आठवलेवर ही कारवाई करण्यात आली आहे. बीडमध्ये जुन्या वादात बदनामी झाल्याच्या रागातून घरात घुसून गोळीबार करण्यात आला होता. या घटनेत एक तरुण गंभीर जखमी झाला होता. विश्वास दादाराव डोंगरे असे या घटनेत जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. डोंगरे आणि आठवले यांच्यात जुना वाद आहे. यापूर्वी देखील आठवले आणि डोंगरे गटात जोरदार राडा झाला होता, दोन्ही गटांकडून परस्परविरोधी तक्रार दाखल करण्यात आली होती. त्यानंतर अक्षय आठवले याने डोंगरे यांच्या घरात घुसून गोळीबार केला होता. यामध्ये विश्वास दादाराव डोंगरे हा तरुण गंभीर जखमी झाला होता. त्यानंतर पोलिसांनी या प्रकरणातील आरोपींना अटक केली. आता त्यांच्यावर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे, या प्रकरणातील दोन आरोपी अजूनही फरार आहेत.

------------

### धनंजय मुंडे यांच्या

याच प्रकरणी आरोपी असलेल्या वाल्मिक कराडवरही मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. काही दिवसांपूर्वी वाल्मिक कराडची तब्येत बिघडल्यानें त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याच्यावर दोन दिवस उपचार सुरु होते. या उपचारावर अंजली दमानिया यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. यानंतर अंजली दमानिया यांनी उपमुख्यमंत्री अजित पवारांकडे भेटीसाठी वेळ मागितली होती. अखेर सोमवारी संध्याकाळी अंजली दमानिया आणि अजित पवार यांची भेट झाली. या भेटीनंतर अंजली दमानिया यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी अजित पवारांसोबत काय चर्चा झाली, याबद्दलची सविस्तर माहिती दिली. ''वाल्मिक कराडचे समर्थक हे दहशतवादी आहेत. त्यांनी बीडमध्ये मोठ्या प्रमाणात दहशत पसरवली आहे. त्याचे सर्व फोटो, रिल्स मी त्यांना दाखवले. त्यांनी ते सर्व शांतपणे पाहिलं. त्यांनी मला असं सांगितलंय की उद्या दुपारी १२ वाजता त्यांची आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मीटिंग आहे. त्यावेळी आम्ही तुम्ही दिलेल्या या सर्वच्या सर्व कागदपत्रांवर चर्चा करु. मुख्यमंत्र्यांशी याबद्दल चर्चा केल्यानंतर आम्ही पुढचा निर्णय घेऊ'', असे अंजली दमानियांनी म्हटले.

------------

### निलंबीत वाहकाची

तिकीट न काढल्याने केलेल्या कारवाईत वाहक अंबलकर यांना निलंबित करण्यात आले होते, या तणावातूनच त्यांनी टोकाचा निर्णय घेतला, हा महामंडळाच्या चुकीच्या व्यवस्थेचा बळी आहे, असा आरोप अंबलकर यांच्या नातेवाइकांनी केला आहे. दत्ता आंबळकर हे गेल्या दहा वर्षापासून परिवहन महामंडळाच्या माजलगाव आगारात वाहक म्हणून कार्यरत होते. महिना भरापूर्वी एका प्रवाशाने तिकीट न घेता प्रवास केल्याचे उघडकीस आल्यानंतर वाहक अंबलकर यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली होती. या कारवाईमुळे वाहक अंबलकर हे तणावात होते. यानंतर ते १२ जानेवारीपासून कोणालाही न सांगता घरातून निघून गेले होते. अंबलकर यांच्या वडिलांनी माजलगाव पोलीस ठाण्यात मिसिंगची नोंद केली होती. दरम्यान, २६ जानेवारीच्या मध्यरात्री अंबलकर यांनी आपल्या शेतात येत शेतातील लिंबाच्या झाडाला दोरीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. सोमवारी सकाळी यांचे वडील शेतात गेल्यावर ही बाब उघडकीस आली. वडवणी पोलिसांनी घटनास्थळी येऊन पंचनामाकरून शवविच्छेदनासाठी कुप्पा येथील आरोग्य केंद्रात पाठवले. नातेवाईकांनी मृतदेह ताब्यात घेण्यास नकार दिल्याने दवाखान्यामध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. यानंतर माजलगाव बस स्थानकाचे आगार प्रमुख कोळपकर यांच्यासह अनेक कर्मचार्यांनी कुप्पा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात येऊन नातेवाईकांची समजूत काढली. कुटुंबातील एका व्यक्तीला महामंडळात नोकरीला घेता येईल असे आश्वासन दिल्यानंतर नातेवाईकांनी मृतदेह ताब्यात घेतला. चिंचाळा येथे दुपारी चार वाजण्याच्या दरम्यान अंत्यसंस्कार करण्यात आले.

------------

### पत्रकार बंडू खांडेकर यांचा मूकनायक

मोहनराव जगताप, बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक बाबुराव पोटभरे, माजलगाव सह. साखर कारखान्याचे चेअरमन विरेंद्र सोळंके आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. माजलगाव एकता पत्रकार संघाच्या वतीने मुकनायक दिनानिमित्त मुकनायक व माजलगाव भुषण पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. पत्रकारितेच्या माध्यमातून बंडूजी खांडेकर यांनी समाजातील वंचित, दुर्बल व उपेक्षित घटकांच्या समस्यांना वाचा फोडण्याचे कार्य सातत्याने केले आहे. त्यांच्या लेखनशैलीतून समाजातील अन्याय, विषमता आणि शोषणाविरुद्ध आवाज उठवण्याचे काम त्यांनी यशस्वीरीत्या केले आहे. सकारात्मक पत्रकारितेचे मूर्तिमंत उदाहरण म्हणून खांडेकर यांच्याकडे पाहिले जाते. पत्रकारितेसोबतच आरोग्य क्षेत्रातील त्यांचे योगदान महत्वपूर्ण आहे. समाजातील गोरगरीब व गरजू रुग्णांना मोफत वैद्यकीय उपचार मिळवून देण्यासाठी ते नेहमीच तत्पर असतात. पुरस्कार स्विकारल्यानंतर खांडेकर यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, ''हा पुरस्कार केवळ माझा नाही, तर समाजासाठी काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा आहे. या पुरस्काराने मला सत्य आणि न्यायासाठी आवाज उठवण्याची आणखी प्रेरणा मिळेल. काम करण्यासाठी अधिक ऊर्जा मिळण्यासोबतच हा पुरस्कार मला वेळोवेळी जबाबदारीची जाणीव करून देत राहील असेही ते म्हणाले. मूकनायक पुरस्कार हा समाजातील परिवर्तनवादी विचारधारेसाठी विशेष ओळखला जातो. या पुरस्कारासाठी बंडू खांडेकर यांची निवड करून समितीने त्यांच्या अथक प्रयत्नांचा सन्मान केला आहे. सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संयोजक ज्योतिराम पांढरपोटे, वाजेद पठाण, राजाभाऊ पाष्टे, नय्युम आतार, वसंत परसे, आनिस आन्सारी आदींसह माजलगाव एकता पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

---------

### संपादक गणेश मोकाशे

केले. त्यांच्या कार्याची दखल घेऊन माजलगाव येथील एकता पत्रकार संघाचे अध्यक्ष ज्योतीराम पांढरपोटे व त्यांच्या टीमने मूकनायक पुरस्कारासाठी संपादक गणेश मोकाशे यांची निवड केली. दिनांक २७ जानेवारी रोजी दुपारी माजलगाव येथे वैष्णोदेवी मंगल कार्यालय येथे मोठ्या थाटामध्ये मूकनायक पुरस्काराचे वितरण करण्यात आले.. यावेळी संपादक गणेश मोकाशे यांचा बीडचे खासदार बजरंग सोनवणे आणि सांगोल्याचे आमदार डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांच्या हस्ते मूकनायक पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन मोहन जगताप, तेलगाव सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन वीरेंद्र सोळंके, बहुजन नेते बाबुराव पोटभरे, चंद्रकांत शेजुळ, भाई मोहन गुंड, ॲड नारायण गोले, एकता पत्रकार संघाचे अध्यक्ष ज्योतीराम पांढरपोटे, वाजेद पठाण, दैनिक राज्य लोकतंत्रचे कार्यकारी संपादक अशोक खाडे, अनिल जाधव,दयानंद स्वामी,माजी जिल्हा परिषद सदस्य डॉ श्रीराम खळगे, माजी जिल्हा परिषद सदस्य आरुण इंगळे, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गट धारुर तालुकाध्यक्ष युवराज लगड,भोर, पत्रकार वसंत परसे,बबलु माने आदी उपस्थित होते.

-------------

### शेतकऱ्यांची कनिष्ठ अभियंता,

पाणी सोडण्यात आले होते यावेळी पाणी सोडण्यासाठी कनिष्ठ अभियंता ओमशांत भास्कर डोके,दप्तर कारकून रोहन बाळासाहेब हाडोळे ,कालवा निरीक्षक देविदास दत्तू गुंड, विकास तुकाराम केदार आणि मारुती आबा पवार हे वाहन चालक कालव्यावर उपस्थित असताना वेल्डिंग रॉड तुटला असल्यामुळे वेल्डिंग करण्यासाठी किरण शिवाजी पवार हे वेल्डिंग मशीन घेऊन आले असता लिंबोडी येथील शेतकरी सतीश जालिंदर आंधळे, आसाराम कुर्मदास आंधळे, संदीप आंधळे, समाधान आंधळे, शिवा आंधळे, सत्यवान आंधळे, गणेश आंधळे, सूरज आंधळे, आणि इतर अनोळखी शेतकऱ्यांनी पाणी का सोडले? असे म्हणून कनिष्ठ अभियंता ओमशांत भास्कर रोडे यांना शिवीगाळ केली त्यावेळी या कर्मचाऱ्यांनी आम्ही सर्व शासकीय कर्मचारी आहोत असे सांगून देखील या शेतकऱ्यांनी वेल्डिंग मशीन कालव्यात फेकून दिली आणि पाटबंधारे विभागाच्या कर्मचाऱ्याकडील नट बोल्ट आवळण्याचे असलेले पाने यांची पिशवी कालव्यात फेकून दिली या वेळी कर्मचाऱ्यांना जीवे मारण्याची धमकी देऊन गाडी पेटवून द्या अशा धमक्या देऊन १२०००/ रू किमतीचे वेल्डिंग मशीन आणि २ हजार रू.चे इतर साहित्याचे नुकसान केल्याबद्दल कनिष्ठ अभियंता ओमशांत भास्कर डोके यांनी फिर्याद दिल्याने वरील शेतकऱ्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून आष्टी पोलीस स्टेशन येथे भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत.. कलम १३२, १८९, २९१ (२) १९०, ३२४ (२) ३५२, ३५१ (२) ३५१ (३) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस निरीक्षक शरद भुतेकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रांत हिंगे, सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय नरवाडे यांनी तात्काळ घटनास्थळी जाऊन पाटबंधारे विभागाच्या कर्मचाऱ्यांना संरक्षण देऊन कडा येथे आणले या प्रकरणी सहाय्यक पोलीस निरीक्षक निरीक्षक विजय नरवाडे हे अधिक तपास करत आहेत.

-----------

### एसटीची १५ टक्के भाडेवाढ

बैठकीत एसटीच्या भाडे वाढीला मंजूरी देण्यात आली आहे. २५ जानेवारीपासून ही दरवाढ लागू झाली आहे. त्यामुळे सर्वसामान्य प्रवाशांच्या खिशाला कात्री लागणार आहे. त्यामुळे ही भाडेवाढ रद्द करण्यात यावी, यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आणि विधान परिषदेचे विरोध पक्षनेते अंबादास दानवे यांनी आंदोलन केले. एसटी महामंडळाकडून करण्यात आलेली १५ टक्के भाडेवाढ ही अन्यायकारक आहे. दोन महिन्यांपूर्वी एसटी महामंडळाच्या अध्यक्षांनी एसटी नफ्यात असल्याची घोषणा केली होती. याबाबत आकडेवारीही जाहीर केली होती. पण आता एसटीकडून तिकिटांमध्ये १५ टक्के भाडेवाढ करण्यात आली. दुर्दैव म्हणजे एसटी ही भाडेवाढ परिवहन मंत्र्यांनाच माहीत नाही. खाते मिळाल्यानंतर परिवहन मंत्र्यांनी केवळ चमकोगिरी केली. कधी बस स्टँडवर गेले तर, कधी एसटीतून प्रवास केला. पण या मंत्र्यांना एसटी प्रवाशांच्या व्यथा समजल्या नाहीत, असे अंबादास दानवे म्हणाले.

-------------

cmyk

cmyk

राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार, दि. २८ जानेवारी २०२५

३

## स्वप्निल नरवडे यास बाल विवेकानंद पुरस्कार प्रदान

बीड : शिक्षण तीर्थ संस्कृती विद्यालय विवेकवर्धिनी गुरुकुलाचा विद्यार्थी स्वप्नील नरवडे यास महाराष्ट्र गुरुकुल शिक्षण व संशोधन परिषद आयोजित राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती निमित्त आयोजित क्रीडा व बौद्धिक स्पर्धेच्या बक्षीस वितरण सोहळ्यात बाल विवेकानंद पुरस्काराने सन्मानित करण्यात आले . अभ्यासात हुशार असण्याबरोबरच विद्यार्थ्यांचे वर्तन त्याचा स्वभाव इतरांना मदत करण्याची भावना याचा विचार हा पुरस्कार देताना करण्यात येतो . विवेकवर्धिनी गुरुकुलाचा बाल विवेकानंद पुरस्कार स्वप्नीलला जाहीर झाला होता त्याचे वितरण आज झाले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गुरुकुल शिक्षण व संशोधन परिषदेचे संस्थापक अध्यक्ष तसेच बालविकास सामाजिक प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष डॉ .दत्ता नलावडे सर होते.प्रमुख पाहुणे म्हणून श्री .कचरू चांभारे सर केंद्रप्रमुख ,तसेच ह .भ .प .मातकर महाराज उपस्थित होते .या कार्यक्रमाला गुरुकुल शिक्षण व संशोधन परिषदेचे सर्व सन्माननीय संचालक मंडळ यांची उपस्थिती होती . तसेच क्रीडा व बौद्धिक स्पर्धेमध्ये विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. हा कार्यक्रम शिक्षणतीर्थ संस्कृती विद्यालयात घेण्यात आला .स्वप्निल ला बाल विवेकानंद पुरस्कार मिळाल्यामुळे संस्थेचे अध्यक्ष डॉ . दत्ता नलावडे सर ,मुख्याध्यापिका सौ .अर्चना जानवळे यांनी त्याचे अभिनंदन केले आहे.

# विकसित जिल्हा अशी बीडची ओळख घडवू

## क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे : ७६ व्या प्रजासत्ताक दिन शानदार सोहळयात संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यात अधिकाधिक सर्वांगीण विकास कामे करून विकसित बीड जिल्हा अशी ओळख प्राप्त करून देण्याचे नियोजन आहे. यासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही, असे प्रतिपादन राज्याचे क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज येथे केले.**

पोलीस मुख्यालय मैदानावर ७६ व्या प्रजासत्ताक दिनाचा मुख्य शासकीय सोहळा श्री भरणे यांच्या हस्ते पार पडला त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आमदार संदीप क्षीरसागर वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी, जिल्हाधिकारी अविनाश पाठक, पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत तसेच जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवने आदींची प्रमुख उपस्थिती होती.

या दिमागदार सोहळ्यात पोलिसदलासह होमगार्ड, एन.सी.सी. तसेच स्काऊट गाईड आदींच्या १९ पथकांनी संचलन केले. या परेडचे नेतृत्व बीडचे पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांनी केले. ध्वजारोहणा नंतर भरणे यांनी परेडची पाहणी केली. आपल्या भाषणात त्यांनी स्वातंत्र्य लढ्यात बलिदान देणारे स्वातंत्र्य सैनिक आणि सीमेवर शहीद झालेल्या जवानांना श्रद्धांजली अर्पण केली.

देशाला पाचवी अर्थसत्ता बनविल्याबद्दल प्रधानमंत्र्याचे त्यांनी आभार मानले. राज्यात ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेला नेण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी संकल्प केला आहे. त्याबद्दल त्यांचे व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांचे त्यांनी आभार व्यक्त केले. आद्यकवी मुकुंदराज यांच्या जिल्ह्यात ध्वजारोहण करण्याची संधी मिळाली हे माझे भाग्य समजतो असे श्री भरणे यावेळी म्हणाले.

खोखो विश्वचषक जिंकून देणारे बीडची कन्या प्रियंका इंगळे तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचे नाव उंचावणारे बीडचे अविनाश साबळे तसेच राहुल आवारे आणि नवनाथ फरताडे यांचे त्यांनी आपल्या भाषणात कौतुक केले.

बीड जिल्हावासियांचे रेल्वेचे स्वप्न केंद्र आणि राज्य सरकारच्या प्रयत्नामुळे साकार होत आहे. यामुळे बाजारपेठ जवळ होऊन जिल्ह्यातील शेतकऱ्यासह सर्वांनाच फायदा होणार आहे असे सांगणे श्री भरणे यांनी सेंद्रिय शेती तसेच रेशीम शेतीत जिल्हाला प्रथम क्रमांकावर आणल्याबद्दल शेतकऱ्यांचे अभिनंदन केले. जिल्हयात क्रीडा सुविधासाठी ८ कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात आले असून माजलगाव, वडवणी, गेवराई, केज, अंबाजोगाई आणि धारूर या ६ ठिकाणी तालुका क्रीडा संकुल उभारण्यात येईल, असेही क्रीडामंत्री यावेळी म्हणाले.जिल्ह्यात होणाऱ्या रस्त्यांच्या कामासाठी ९०० कोटीहून अधिक खर्च करण्यात येत आहे तसेच जिल्हाधिकारी कार्यालय इमारतीसह इतर ५१ कामासाठी ३२१ कोटी ५० लाखांचे कामे प्रगतीपथावर आहेत याचा उल्लेख त्यांनी आपल्या भाषणात केला. कार्यक्रमानंतर जिजाऊ मल्टीस्टेट गुन्हयाचा तपास लावणारे पोलीस उपनिरीक्षक सिद्धेश्वर मुरकुटे व तुळशीराम जगताप यांचा सन्मान करण्यात आला तसेच मंत्री महोदयांचे हस्ते शहीद जवान पांडुरंग वामन तावरे यांच्या वीर पत्नी गोदावरी तावरे यांना ताम्रपट प्रदान करण्यात आला. यावेळी शाळांच्या पथकांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पोलीस दलाचे अनिल शेळके यांनी केले.

## भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त अंबाजोगाई सहकारी साखर कारखाना येथे चेअरमन रमेश आडसकर यांच्या हस्ते ध्वजारोहण

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**अंबाजोगाई सहकारी साखर कारखाना लि.अंबासाखर येथे ७६ व्या भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त रविवार, दिनांक २६ जानेवारी २०२५ रोजी चेअरमन रमेशराव आडसकर यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले.**

यावेळी अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन दत्तात्रय पाटील, अंबाजोगाई कृ.उ.बा.समितीचे सभापती ऍड.राजेश्वरराव चव्हाण, केज कृ.उ.बा.समितीचे सभापती अंकुशराव इंगळे, धारूर कृ.उ.बा.समितीचे उपसभापती सुनीलराव शिनगारे, बीड जिल्हा परिषदेचे माजी शिक्षण व आरोग्य सभापती राजेसाहेब देशमुख, अंबाजोगाई कृ.उ.बा.समितीचे माजी सभापती विलासराव सोनवणे, अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याचे सर्व संचालक श्री.ऍड.प्रमोद जाधव, ऍड.लालासाहेब जगताप, ऋषिकेश आडसकर, गोविंदराव देशमुख, राजाभाऊ औताडे, जीवनराव कदम, अशोकराव गायकवाड, बालासाहेब सोळंके, विठ्ठलराव देशमुख, अनंतराव कातळे, लक्ष्मीकांत लाड, विजयराव शिनगारे, संभाजीराव इंगळे, मिनाज युसुफखाँ पठाण, मधुकरराव शेरेकर, रमाकांतराव पिंगळे, अनिलराव किर्दंत, शशिकांतराव लोमटे, श्रीमती भागिरथीबाई साखरे, श्रीमती वच्छलाबाई शिंदे, माजी कार्यकारी संचालक एस.बी.साखरे, कार्यकारी संचालक दत्तात्रय मरकड यांच्यासह लातूर जिल्हा परिषदेचे माजी सदस्य साहेबराव पवार, माजी संचालक दाजिसाहेब लोमटे, उध्दवराव इंगोले, अजयराव (चिमू) पाटील, शिवाजीराव मायकर, रमेशराव नखाते, धारूर पंचायत समितीचे माजी सभापती विलासराव खुळे, सरपंच शशीभैय्या आडसकर, ऍड.बालासाहेब इंगळे, रामकिसन खोडसे, शिंदे मामा, बाळासाहेब देशमुख, मोरेवाडीचे माजी सरपंच वसंतराव मोरे, माजी नगरसेवक कमलाकर कोपले, अनिल माचवे यांच्यासह सर्वपक्षीय नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते आणि बहुसंख्येने सभासद, ऊस उत्पादक शेतकरी, कारखान्याचे सर्व खातेप्रमुख, अधिकारी, कर्मचारी, पत्रकार, पंचक्रोशीतील नागरिक उपस्थित होते. प्रारंभी उपस्थित मान्यवर, कारखाना परिसरातील शालेय विद्यार्थी, शिक्षकवृंद, अंबासाखरचे अधिकारी, विभागप्रमुख आणि कर्मचारी, सुरक्षा रक्षक यांनी मानवंदना दिली. सर्वांच्या सामुहिक राष्ट्रगीत गायनानंतर कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला. तर उपस्थितांना चहापान करण्यात आले. या प्रसंगी चेअरमन रमेशराव आडसकर यांनी ध्वजवंदन कार्यक्रमासाठी कारखान्याच्या प्रांगणात उपस्थित झालेल्या सर्वांच्या भेटी घेऊन त्यांची आस्थेवाईकपणे चौकशी करून संवाद साधला. तसेच ७६ व्या भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त उपस्थित सर्वांना शुभेच्छा दिल्या.



## सीईओ आदित्य जीवने यांच्या हस्ते जिल्हा परिषदेत ध्वजारोहन

बीड । प्रतिनिधी

भारतीय प्रजासत्ताक दिनाचा ७६ वा वर्धापन दिन बीड जिल्हा परिषदेच्या प्रांगणात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक आदित्य जीवने यांच्या शुभहस्ते रविवारी साजरा करण्यात आला. यावेळी सर्व उपस्थित विभाग प्रमुख अधिकारी कर्मचारी यांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना देऊन राष्ट्रगीत गायीले.

यावेळी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांच्या प्रकल्प संचालक श्रीमती संगीतादेवी पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.) प्रदीप काकडे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी सुरेश केंद्रे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेश मोराळे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) भगवान फुलारी, शिक्षणाधिकारी (मा.) नागनाथ शिंदे, शिक्षणाधिकारी (निरंतर) संजय पंचगल्ले, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता मुकुंद आंधळे, कार्यकारी अभियंता पवार, आदींसह विभाग प्रमुख अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



ध्वजारोहणा नंतर मुख्य कार्यकारी अधिकारी सर्व उपस्थित त्यांना भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमानंतर जिल्हा परिषदेच्या आवारात सीईओ आदित्य जीवने आणि अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आले.

पान ६ वरून...

### आष्टीमध्ये ७६ वा

तर कडा येथील अमरावती विद्यालयाच्या स्काऊट व एनसीसीच्या विद्यार्थिनींनी विद्यार्थ्यांनी स्काऊटचे संचालन साधारण केले तसेच आष्टी शहरातील वसुंधरा विद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांनी संपूर्ण शहरांमध्ये प्रभात फेरी काढून बालविवाह थांबवा स्वच्छता राखा असा संदेश दिला. तहसील कार्यालयात ध्वजारोहण प्रसंगी आमदार सुरेश धस माजी आमदार शिक्षण महर्षी भीमराव धोंडे माजी आमदार बाळासाहेब आजबे माजी आमदार साहेबराव दरेकर वकील डॉक्टर व्यापारी कार्यकर्ते ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते आष्टी तहसील कार्यालयाच्या वतीने गतवर्षी तहसिलदार वैशाली पाटील मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते या शिबिराला देखील नागरिकांनी उत्कृष्ट प्रतिसाद दिला. आष्टी तालुक्यामध्ये अवैध धंदे हातभट्टी विक्री इतर अवैध धंदे बंद झाल्याने नागरिकांनी प्रशासनाचे व आमदार सुरेश धस यांची आभार मानते आहेत.

### चौसाळा बसस्थानकात

नाईकवाडे (फौजी) सूर्यकांत अवताडे मन्मथ विधाते चौसाला वाहतूक नियंत्रक के पी बोबडे ज्येष्ठ पत्रकार एन टी वाघमारे पत्रकार बळीराम राऊत संजय भिलारे व विकास सर्वज्ञ या प्रसंगी उपस्थित होते

### गंगाई-बाबाजी राज्यस्तरीय

सभापती राम शिंदे , प्रसिद्ध सिनेअभिनेत्री कल्याणी चौधरी,मा.आ.भिमरावजी धोंडे, युवा नेते अजय धोंडे, तर यांच्या उपस्थितीत दिला जाणार आहे.तर दुपारी ४ वाजता खुल्या लावणी नृत्य स्पर्धा होणार आहेत. तरी वरील कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन प्राचार्य डॉ दत्तात्रय वाघ, उपप्राचार्य डॉ ज्ञानदेव वैद्य, उपप्राचार्य डॉ आप्पासाहेब टाळके, उपप्राचार्य सुनील भवर, डॉ बाळासाहेब गावडे, डॉ आबासाहेब पोकळे ,डॉ वंदना घोडके व संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

**हे ठरले पुरस्काराचे मानकरी**

१) धार्मिक क्षेत्र- ह भ प पांडुरंग जाधव गुरुजी

अशोक देवा जोशी २)सामाजिक क्षेत्र- संजय भास्करराव सानप, डॉ. महेश गोलेकर, श्रीमती लता उत्तम शिंदे, सोनाली संजय बोऱ्हाडे ३) कृषी क्षेत्र- अशोक मारुतीराव गुट्टे,हनुमंतराव गावडे

४) साहित्य क्षेत्र - प्रोफेसर सुधाकर शेलार ५) पत्रकारिता क्षेत्र - शेख निसार हाफीजोद्दीन ( दै.सकाळ ,आष्टी ), विजयकुमार गाडेकर( शिरूर लोकमत), हमीद खान पठाण, शरद तळेकर, अशोक भांडेकर ६) शिक्षण क्षेत्र - प्राचार्य डॉ सोपानराव निंबोरे, डॉक्टर बापू खैरे, उत्तम पवार, शहादेव मुळे, श्रीमती शबनम मुबारक काझी, श्रीमती प्रतीक्षा राजेंद्र मेश्राम, डॉ संजय माणिकराव धोंडे, अशोक डोके, ज्ञानेश्वर राऊत ७) आदर्श उद्योजक- अशोक शेठ भंडारी, हनुमंत जीवे, पांडुरंग सोनवणे ८) आदर्श तलाठी- श्रीमती मंगल बाबुराव सानप,

९) आदर्श ग्रामसेवक- श्रीमती निशा रावसाहेब आदक, श्रीमती वर्ष भोपळे, १०) कलाक्षेत्र- कुमारी वैभवी टाकणकर ११) क्रीडा क्षेत्र- सोनबा गोगाणे कुस्ती, कुमारी शेख भूषरा नुर.

### जिल्हा वाहतूक शाखेची

हवालदार हारके, यांच्यासह अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक मधुकर रोडे, पो.कॉ. पारवे,पो.कॉ. फड महिला पोलीस कॉन्स्टेबल सारिका साळुंके यांनी सोमवारी अंबाजोगाई शहरातील शिवाजी चौक, तथागत चौक या भागात कारवाई करून ठोठो आवाज करणाऱ्या बुलेटचे आठ सायलेन्सर जप्त केले. याशिवाय या भागात ९५ केसेस करून बहात्तर हजार रुपयांचा दंड केला. यामध्ये लायसन नसणे, गाडीची नंबर प्लेट फॅन्सी असणे, कागदपत्र जवळ नसणे आदी बाबींचा समावेश आहे. ही कारवाई सकाळी १२ वाजता सुरू झाली ती दुपारी २.३० पर्यंत चालली. यानंतरही कारवाई सुरूच राहील अशी माहिती जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांनी दिली.

## जोधाप्रसादजी मोदी विद्यालयात देशाचा ७६ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

ंबाजोगाई शहरातील जोधाप्रसादजी मोदी विद्यालयात भारताचा ७६ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी जेष्ठ समाजिक कार्यकर्ते राजेंद्र मोरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहण प्रसंगी संस्थापक राजकिशोर मोदी, मार्गदर्शक प्रा वसंत चव्हाण, कापूस पणन महासंघाचे संचालक ऍड विष्णुपंत सोळंके, अंबाजोगाई पिपल्स बँकेचे उपाध्यक्ष प्रकाश सोळंकी, संस्थेचे कार्यकारी संचालक संकेत मोदी,चंद्रकांत गायकवाड, मुख्याध्यापक आनंद टाकळकर, विनायक मुंजे यांच्यासह शाळेतील सर्व विद्यार्थी तथा शिक्षक उपस्थित होते.



प्रजासत्ताक दिनी प्रथमतः राष्टापिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस वंदन करून राजेंद्र मोरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहण झाल्यानंतर सामूहिक संविधान वाचन करण्यात आले. संगीत शिक्षक शिनगारे यांनी महाराष्ट्र गीत गायले. त्यानंतर राजकिशोर मोदी व राजेंद्र मोरे यांनी सर्वांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

ध्वजारोहण कार्यक्रमासाठी अंबाजोगाई शहरातील राजकिशोर मोदी यांचे सर्व सहकारी कचरूलाल सारडा, किशोर परदेशी, विलास जाधव, रवि परदेशी, दिनेश भराडीया , सुनील वाघाळकर , माजी नगरसेवक धम्मा सरवदे, जावेद गवळी, दत्ता सरवदे, अंकुश हेडे, आकाश कऱ्हाड, सय्यद ताहेर, अकबर पठाण, अजीम जरगर यांच्यासह अंबाजोगाई पिपल्स बँकेचे सर्व कर्मचारी, योगेश्वरी पतसंस्था, श्री योगेश्वरी मल्टिस्टेट, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले महिला ना सह पतसंस्था, अल फलाह ना सह पतसंस्था तसेच मानव विकास अपंग , मूकबधिर विद्यालयाचे सर्व कर्मचारी त्याचबरोबर घटनागणाथ विद्यालयाचे कर्मचारी उपस्थित होते.

## संत बाळुदेव महाराज विद्यालय व महिला महाविद्यालय शाळेत कर्नल कल्याण डोरले यांच्या हस्ते ध्वजारोहण

पाटोदा । प्रतिनिधी

आनंद चरिटेबल आष्टी द्वारा संचालित संत बाळुदेव महाराज विद्यालय व महिला महाविद्यालय प्राथमिक व माध्यमिक शाळेतील प्रजासत्ताक दिनानिमित्ताने पाटोदा येथील कर्नल कल्याण डोरले यांच्या शुभहस्ते हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.यावेळी प्रमुख उपस्थिती भाई , शेख इम्रान नुर (,( जिल्हाध्यक्ष - विश्वमानव सुरक्षा संघ, तथा माजी ग्रामपंचायत सदस्य) अनिल जायभाय (माजी सभापती प.स.सदस्य पाटोदा)

माजी उपसरपंच संजय कांकरिया, डिंगबर नाईकनवरे ( सामता परिषद पाटोदा)

अब्दुल कादर मकराणी (तालुकाध्यक्ष महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ पाटोदा) अजय जोशी (तालुकाध्यक्ष मराठी पत्रकार परिषद पाटोदा) समाज सेवक स्वामी सानप, सौ.अजंली जोशी ,दत्ता देशमाने (संस्थापक - सचिव माणुसकीची भिंत बहुउद्देशीय सेवा भावी संस्था ) रामदास भाकरे, भिमराव घोलप, प्रल्हाद सानप, भास्कर सानप, शिवाजी सानप,पत्रकार हमीदखान पठाण, जावेद शेख सतिश गर्जे प्रमुख उपस्थितीत होती व यावेळी विविध कार्यक्रमाने उत्साहात प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला, सर्व प्रथम गावातून विद्यार्थ्यांची प्रभातफेरी काढण्यात आली,अनेक विद्यार्थ्यांनी प्रजासत्ताक दिनाच्या औचित्य साधून आपले विचार व्यक्त करून येणाऱ्या पाहुण्यांचे मने जिंकली शिक्षकांचेही अभिनंदन केले,या वेळी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व गावातील सर्व प्रतीष्ठीत नागरीक उपस्थित होते.या कार्यक्रमात सुत्रसंचलन प्राचार्य राजेंद्र आविळे तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक मधुकर बोखारे सर यांनी मानले.



## कोतनच्या गजानन सार्वजनिक वाचनालयाकडून आदर्श विद्यार्थी पुरस्काराचे वितरण

**अंमळनेर । प्रतिनिधी**

गावाची वाचनाची भूक भागवत असतानाच गेल्या आठ वर्षापासून गजानन सार्वजनिक वाचनालयातर्फे कोतन येथील जिल्हा परिषद शाळेतील होतकरू व हुशार विद्यार्थ्यांना शालेय साहित्य देऊन पुरस्कार देत आहे.सालाबादाप्रमाणे याहीवर्षी २६ जानेवारीला सदरील पुरस्कारचे वितरण करण्यात आले.ट्रॉफी, पेन व पॅड असे पुरस्काराचे स्वरूप आहे.सलग आठ वर्षापासून हा उपक्रम सुरू असून कौतुकास्पद उपक्रम असल्याची प्रतिक्रिया ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.पाटोदा तालुक्यातील कोतन येथे श्रीकृष्ण विठ्ठल घुशीर यांनी गावची वाचनाची अडचण पाहता एक वाचनालय सुरू करण्याची प्रयत्न केले आणि त्याला यश देखील आले. विविध वर्तमानपत्र सकाळीच कोतन गावात येतात त्याचा आस्वाद गावकरी घेत देश विदेश, जिल्हाधिकारी घटनेचा तपशील त्यांना सहजपणे कळत असतो या बरोबर आपण गावकऱ्यांचे समाजाचे काहीतरी देणे लागतोच याचा विचार असल्याने श्रीकृष्ण घोशीर यांनी कोतनच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत जाऊन मुख्याध्यापक यांच्या सोबत चर्चा करून गरीब हुशार आणि होतकरू दोन विद्यार्थ्यांना शालेय साहित्य देत पुरस्कार देण्याचा मनोदय व्यक्त केला. आणि या उपक्रमाला तात्काळ सहमती दिली.त्यानुषंगाने गेल्या आठ वर्षापासून दोन विद्यार्थ्यांना शालेय साहित्य देत हा पुरस्कार दिला जातो.यावर्षी आदर्श विद्यार्थिनी शुभांगी नारायण इथापे राहणार पांढरवाडी व शितल ज्ञानदेव महारनवर राहणार



कोतन या विद्यार्थिनींची निवड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोतन चे मुख्याध्यापक व शिक्षकांच्या निवडीनुसार करण्यात आली.विद्यार्थिनींचा सत्कार गजानन सार्वजनिक वाचनालय कोतन या वाचनालयाच्या नावाने ट्रॉफी व पेन पॅड या शालेय साहित्य देऊन त्यांचा सन्मान वाचनालयाच्या पदाधिकाऱ्यांनी केला.ज्यांच्या घरची परिस्थिती गरिबीची तसेच विद्यार्थी नियमितपणे शाळेत येणारा, हुशार अशा अटी असलेला विद्यार्थी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोतन नामांकन शाळा निवडते व २६ जानेवारी रोजी झेंडा वंदनानंतर त्या विद्यार्थिनींचा सन्मान गजानन सार्वजनिक वाचनालया तर्फे दरवर्षी निवडक विद्यार्थ्यांना पुरस्कार देण्यात येतो. वाचनालयाकडून शाळेला पुस्तक ठेवण्यासाठी एक स्टॅन्ड व वर्तमानपत्रासाठी एक स्टॅन्ड दिलेले आहे. दररोज वर्तमानपत्रे विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध होतात या सर्वांचा उपयोग विद्यार्थी विद्यार्थी गुणवत्ता वाढीसाठी व वाचन प्रेरणा देण्यासाठी उपयोग होतो. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोतन नामांकन या शाळेमध्ये ४२५ विद्यार्थी आहेत.हातोला,अंमळनेर,पांढरवाडी, दौलतवाडी, गांधणवाडी व मिसळवाडी येथून विद्यार्थी बहुसंख्येने या शाळेमध्ये येतात. या कार्यक्रमाला शाळेचे मुख्याध्यापक सोनवणे, सरपंच वैशालीताई खेंगरे,गांधनवाडी चे सरपंच अशोक जेधे ,शालेय समिती अध्यक्ष महेश खेंगरे ,सेवा सहकारी सोसायटी चे चेअरमन राजू वंजारी, केंद्रप्रमुख उकांडे ,ग्रामसेवक हरिचंद्र पवार,रामा उगलमुगले ,उपसरपंच मंदा गाडे,माजी सरपंच शिवाजी घोशिर,संजय घोशिर ,ग्रामपंचायत सदस्य सुशेन घोशिर,गोविंद घोशिर,ज्ञानदेव राजगुरू,अक्षय भवर ,दादा बेदरे ,गोकुळ घोशिर ,नजीर पठाण बादशाह पठाण,अशोक खेंगरे,लक्ष्मण गावडे ,बळीराम घोशिर,संजय गुळवे,शादीक आतार,बबन पोकळे,तुळशीराम घोशीर,तुकाराम गायकवाड वसंत पोकळे ,नारायण मानसिंग,रफिक तांबोळी ,सुशेन सोमीनाथ घोशिर ,माऊली गाडे ,महादेव पाचपुते,निवृत्त घोशिर सुभाष घोशिर,दादाराव घोशीर,बबन महानवर,मारुती मोरे, लिंबाजी राऊत,सुखरूप महाराज,भाऊसाहेब गरवकर तसेच पंचक्रोशीतील ग्रामस्थ उपस्थित होते.

cmyk

# एकीकडे महायुती सरकारकडून कोट्यवधींच्या बाता

## दुसरीकडे खरेदी केंद्रावरील प्रतीक्षेमुळे सोयाबीन शेतकऱ्यांचा प्राण डोळ्यात आला

गेल्या वर्षभराहूनही अधिक काळासाठी सोयाबीन हमीभावावरून नाराज शेतकऱ्यांची सोयाबीनच्या विक्रीसाठीची धडपड सुरूच आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी बारदाना नसल्याने सोयाबीन खरेदी केंद्र ठप्प होती. आता खरेदी केंद्र सुरू झाली आहेत पण सोयाबीनचा काटा होत नसल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.राज्यातील सोयाबीन खरेदी आता केवळ ३१ जानेवारीपर्यंतच सुरू राहणार असल्याने प्लीज सोयाबीन खरेदी केंद्रांच्या बाहेर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. त्यामुळे हजारो शेतकरी प्रतीक्षेत आहेत. हमीभावाने सोयाबीन विक्री करता यावी यासाठी शेतकऱ्यांची धडपड सुरू आहे. सोयाबीनचा काटा होण्यास ३-३ दिवस प्रतीक्षा करावी लागत असून काही जणांना केंद्रावरच मुक्काम करावा लागतोय. सोयाबीन खरेदीची मुदत अवघ्या चार दिवसात संपणार असल्याने अनेक शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे.

सोयाबीन शेतकऱ्यांसाठी एका बाजूला महायुतीच्या कोट्यवधींच्या बाता सुरू असताना खरेदी केंद्रांच्या ढिसाळ व्यवस्थेमुळे सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचा प्राण डोळ्यात आला आहे. आधी बारदाना नव्हता म्हणूनच सोयाबीन विक्री रखडली, आता खरेदी केंद्राबाहेर विक्रीसाठी रांगच रांग आहे. त्यामुळे हजारो शेतकरी हमीभावाने सोयाबीन विक्रीसाठी प्रतीक्षेत आहेत. वाहनांच्या किरायाने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडले आहे.



लातूर जिल्ह्यात १६ ठिकाणी गेल्या तीन महिन्यांपासून हमीभावाने सोयाबीन खरेदीची प्रक्रिया सुरू आहे. जिल्ह्यातील जवळपास ४७ हजार ६७१ शेतकऱ्यांनी हमीभावाने सोयाबीन विक्रीसाठी केंद्रांवर ऑनलाईन नोंदणी केली असून, यापैकी जवळपास बारा हजार ४६३ शेतकऱ्यांच्या एकूण जवळपास तीन लाख क्विंटल सोयाबीनची हमीभावाने खरेदी करण्यात आलीय. ऑनलाईन नोंदणी केलेले जवळपास १४ हजार शेतकरी अद्यापही खरेदीच्या प्रतीक्षेत आहेत. पाच दिवसांनी खरेदीची मुदत संपणार असल्यामुळे या मुदतीत सोयाबीनची खरेदी होणार की नाही असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा टाकलाय.

खरेदी केंद्रातील प्रतीक्षा आर्थिक गणित जुळेना

खरेदी केंद्रावर सोयाबीन घेऊन आलेले वाहने किमान चार ते पाच दिवस काटा होण्यासाठी लागत असल्याने किराया भरमसाठ होत आहे. एका कट्ट्याला ८० ते १०० रुपये किराया पडतो... चार दिवस होल्डिग चार्जेस बाराशे ते दीड हजार रुपये द्यावे लागतात. ड्रायव्हर भत्ता वेगळा. स्वतःच्या जीवनाचा खर्च वेगळा.या सर्व प्रतीक्षेत प्रती ट्रॅक्टर किमान नऊ ते १४ हजारापर्यंत खर्च होतोय यामुळे क्विंटल मागे आठशे रुपयाचा वाढून मिळणारा मूल्य नको तिथे खर्च होतो. पाच ते सहा दिवस वाढणारा मनस्ताप वेगळाच. त्यामुळे सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना सोयाबीन खरेदीसाठी वाट पाहण्याशिवाय पर्याय उरला नसल्याचे चित्र आहे.

# दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६४६ : मराठी राज्याची राजमुद्रा वापरुन लिहीलेले शिवाजीराजांचे पहिले पत्र उपलब्ध
१९४२ : दुसरे महायुद्ध – जपानी फौजांनी शांघाय शहराचा ताबा घेतला.
१९६१ : 'एच. एम. टी. वॉच फॅक्टरी' हा भारतातील पहिला घड्याळांचा कारखाना बंगलोर येथे सुरू झाला.
१९७७ : मिर्झा हमीदुल्ला बेग यांनी भारताचे १५ वे सरन्यायाधीश म्हणून कार्यभार सांभाळला.
१९८६ : चॅलेंजर या अवकाशयानाचा उड्डाणानंतर ७४ सेकंदांनी स्फोट झाला.
२०१० : १९७५ मधे बांगलादेशचे राष्ट्राध्यक्ष शेख मुजीबूर रहमान यांची हत्या करणाऱ्याला फाशी देण्यात आले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४५७ : हेन्री (सातवा) – इंग्लंडचा राजा (मृत्यू: २१ एप्रिल १५०९)
१८६५ : 'पंजाब केसरी' लाला लजपतराय – स्वातंत्र्यसेनानी (मृत्यू: १७ नोव्हेंबर १९२८)
१८९९ : फील्डमार्शल के. एम. करिअप्पा – स्वतंत्र भारताचे पहिले लष्करप्रमुख (मृत्यू: १५ मे १९९३)
१९२५ : डॉ. राजा रामण्णा शास्त्रज्ञ, अणुऊर्जा आयोगाचे ४ थे अध्यक्ष (मृत्यू: २३ सप्टेंबर २००४)
१९३० : पं. जसराज – मेवाती घराण्याचे शास्त्रीय गायक
१९३७ : सुमन शंकर हेमाडी तथा सुमन कल्याणपूर – चित्रपट व भावगीत गायिका. त्यांनी हिन्दी, मराठी, गुजराथी, बंगाली, पंजाबी, उरिया इ. अनेक भाषांत गाणी गायिली आहेत.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५४७ : हेन्री (आठवा) – इंग्लंडचा राजा (जन्म: २८ जून १४९१)
१६१६ : संत दासोपंत समाधिस्थ (जन्म: २४ सप्टेंबर १५५१)
१८५१ : बाजीराव पेशवे (दुसरे) यांचे कानपूरजवळ ब्रम्हावर्त येथे निधन झाले. (जन्म: १० जानेवारी १७७५)
१९८४ : सोहराब मेहेरबानजी मोदी – चित्रपट निर्माते, दिग्दर्शक व अभिनेते, दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित (१९७९), 'मिनर्व्हा मुव्हीटोन'तर्फे त्यांनी चाळीसहून अधिक चित्रपट निर्माण केले. (जन्म: २ नोव्हेंबर १८९७)
१९९६ : बर्न होगार्थ – जंगलचा सम्राट टारझन याला कार्टुनद्वारे अजरामर करणारे अमेरिकन व्यंगचित्रकार, लेखक, शिक्षणतज्ञ (जन्म: २५ डिसेंबर १९११ शिकागो, इलिनॉय, यू. एस. ए.)
१९९७ : डॉ. पांडुरंग वासुदेव तथा पां. वा. सुखात्मे – आंतरराष्ट्रीय कीर्तीचे संख्याशास्त्रज्ञ व आहारतज्ञ, पद्मभूषण (१९७१) (जन्म: २७ जुलै १९११)
२००७ : ओंकार प्रसाद तथा ओ. पी. नय्यर – संगीतकार (जन्म: १६ जानेवारी १९२६).

# पान मळ्यांची शेती देते मोठा नफा



कोणत्याही उत्पादनवाढीसाठी आवश्यकता असते ती पोषक वातावरणाची. त्याचप्रमाणे पान मळ्यांच्या शेतीसाठी आवश्यकता आहे ती, उष्णकटिबंधीय हवामानाची. उंच जमिनीवर तसेच पाणथळ भागात याची लागवड करता येते. केरळमध्ये सुपारी आणि नारळाच्या बागांमध्ये प्रामुख्याने आंतरपीक म्हणून सुपारीची पानांची लागवड केली जाते. या पिकासाठी सुपीक मातीच योग्य असते. तर ज्या भागामध्ये पाणी साचले जाईल किंवा ज्या ठिकाणी खारे पाणी आणि क्षारयुक्त माती असेल त्या ठिकाणी या पिकाची वाढ जोमात होत नाही. भुसभूशीत जमिन क्षेत्रावर सुपारी पानांची वाढ जोमात होते. पिकाची वाढ जोमात होण्यासाठी पाणी पुरवठा, योग्य वातावरण आणि ज्या ठिकाणी २०० ते ४५० सेंमी पावसाची वार्षिक सरासरी आहे त्या ठिकाणी सुपारी पानांची वाढ होते. या पिकाच्या वाढीसाठी किमान तापमान हे १० अंश सेल्सिअस तर जास्तीत जास्त ४० अंश पर्यंत तापमान सहन करु शकते. उष्ण आणि कोरडी हवा यासाठी धोकादायक आहे.

लागवडीची पध्दत : जगात सुमारे १०० प्रकारचे पान आहे, त्यापैकी सुमारे ४० भारतात आणि ३० पश्चिम बंगालमध्ये आढळतात. पानाचे प्रामुख्याने पाच प्रकार आहेत. यामध्ये देसावरी, बांगला, कापूरी, मिथा आणि सांची यांचा समावेश आहे. कापुरी आणि सांची प्रामुख्याने द्वीपकल्पीय पीक भारतात केले जातात, तर बांगला आणि देसवारी सामान्यत: उत्तर भारतात घेतले जातात. पश्चिम बंगालमध्ये व्यवसायिक पातळीवर मिठाईसाठी ही पाने पिकवली जातात. हे एक भांडवल देणारे आणि नगदी पीक आहे.

असे करा व्यवस्थापन : कृषी शास्त्रज्ञ डॉ. एस. के. सिंग यांच्या मते, पीकाची योग्य वाढ होण्यासाठी पिकानुसार वेल पसरणे गरजेचे आहे. त्यामुळे चांगली वाढ व्हावी म्हणून २ मीटर रुंद खाटा बनवल्या जातात. लगतच्या दोन बेडच्या मध्ये ड्रेनेज ट्रेंच ०.५ मीटर रुंदी ०.५ मीटर खोली घेतली जाते. त्यानंतर या पानाची बीजे लांब रांगांमध्ये लावावी लागणार आहेत. बेडच्या काठावर मोठी झुडपे लावली जातात, ज्याचा उपयोग आधार जगण्यासाठी वेली बांधण्यासाठी आणि सुपारीची पाने पॅक करण्यासाठी केला जातो. जेव्हा वेलीची लांबी ही ४ मीटरपेक्षा जास्त होते त्यावेळी तेव्हा उंची राखण्यासाठी त्यांना वरच्या बाजूला ठेवले जाते.

असे करा पाण्याचे नियोजन : लागवड केल्यानंतर किंवा आठवड्यातून एकदा पाणी देणे गरजेचे आहे. त्यामुळे लवकर तर उगवण होतेच पण एका महिन्यात वाढही सहज शक्य होते. १५ ते २० सेंटीमीटर वाढ झाली की पानाच्या वेलीला छताचा अधार देणे गरजेचे आहे. अशावेळी छतावर जोपासना झाली तरच योग्य वाढ होणार आहे. वेलींच्या वाढीप्रमाणे दर १५-२० दिवसांनी त्याची तपासणी करणे गरजेचे आहे.

# रताळ्याच्या या आहेत प्रसिद्ध जाती ; होईल उत्पादनात वाढ

रताळे हे नैसर्गिकरित्या गोड मूळ पीक आहे. वर्षभर त्याची लागवड केली जाते. पण विशेषतः हिवाळ्यात त्याचे प्रमाण जास्त असते. बाजारात रताळ्याला नेहमीच मागणी असते. बटाट्यासारखे दिसणारे रताळे विविध राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर घेतले जातात. संपूर्ण जगाला भारतात पिकवल्या जाणाऱ्या रताळ्याची चव आवडते. रताळ्याच्या पाच प्रसिद्ध जाती आहेत ज्यांच्या लागवडीमुळे चांगले उत्पादन मिळते आणि शेतकरी त्यांची लागवड करून चांगला नफा देखील मिळवू शकतात.

या जातींची लागवड करा : श्रीभद्रा – ही रताळ्याची उच्च उत्पन्न देणारी जात आहे. ही जात ९० ते १०५ दिवसांत तयार होते. त्यात रुंद पाने असतात. हे कंद आकाराने लहान आणि गुलाबी असतात. या कंदामध्ये ३३ टक्के कोरडे पदार्थ, २० टक्के स्टार्च आणि २.९ टक्के साखर असते.गौरी – रताळ्याच्या या जातीचा शोध १९९८ साली लागला. गौरी वाण तयार होण्यासाठी ११० ते १२० दिवस लागतात. रताळ्याच्या या जातीच्या कंदांचा रंग जांभळा आणि लाल असतो. गौरी जातीच्या रताळ्याचे सरासरी उत्पादन हेक्टरी सुमारे २० टन आहे. श्री कनका – रताळ्याची श्री कनका जात २००४ मध्ये विकसित करण्यात आली. या जातीच्या कंदाची साल दुधाळ रंगाची असते. तो कापल्यावर पिवळ्या रंगाचा लगदा दिसतो.

ही जात १०० ते ११० दिवसांत पक्व होते. या जातीचे उत्पादन हेक्टरी २० ते २५ टन आहे. सीपस्वा २ – रताळ्याच्या या जातीचे उत्पादन आम्लयुक्त जमिनीत होते. त्यामध्ये कॅरोटीन मुबलक प्रमाणात असते. रताळ्याची ही जात ११० दिवसांत पिकते. त्याचे उत्पादन हेक्टरी २० ते २४ टन आहे. एसटी १४ – रताळ्याच्या या जातीचा शोध २०११ मध्ये लागला. रताळ्याच्या या जातीच्या कंदांचा रंग किंचित पिवळा असतो.

लगद्याचा रंग हिरवा आणि पिवळा असतो. या जातीमध्ये व्हिटा कॅरोटीन (२० मिग्रॅ प्रति ३० ग्रॅम) जास्त प्रमाणात असते. ही जात तयार होण्यासाठी ११० दिवस लागतात. जर आपण त्याच्या उत्पादनाबद्दल बोललो तर ते सुमारे ७० टन प्रति हेक्टर आहे.



# खोडवा उसापासून होणारे फायदे



१. लागण उसाप्रमाणे खोडवा पिकासाठी पूर्वमशागत करावी लागत नसल्याने जमिनीतील पूर्वमशागतीवरील खर्च वाचतो. त्यामुळे साधारणपणे सुरु उसासी तुलना करताना हेक्टरी रु.१२००० ते १५००० इतकी खर्चात बचत होते. २. पूर्वमशागतीवरील खर्चाबरोबरच शेताच्या तयारीसाठी लागणारा वेळ आणि श्रम यांची बचत होते. ३. खोडवा घेतल्यामुळे ऊस लागवडीसाठी लागणारे ऊस बेणे, बीजप्रक्रिया व ऊस लागवड इत्यादी बाबतीत खर्चात बचत होते. साधारणपणे सुरु ऊसासी तुलना करताना प्रति हेक्टरी रु.२१०००/-पर्यंतच्या खर्चाची बचत होते. ४. खोडवा पिकास फुट होण्यासाठी जमिनीतील कांडयावर भरपूर डोळे असतात. त्यामुळे ऊसांची संख्या लागणीच्या ऊसापेक्षा जास्त मिळते. ५. खोडवा पीक पाण्याचा ताण जास्त प्रमाणात सहन करते, त्यामुळे पाण्याचा ताण पडल्यास उत्पादनात फारशी तफावत पडत नाही. ६. खोडवा पिकात पाचटाचा पूर्ण वापर करणे सहज शक्य होते. पाचटाचा आच्छादन म्हणूनही उपयोग होत असल्याने पाण्याची कमतरता असल्यास खोडवा पीक चांगले तग धरते.

खोडवा पीक घेतांना विचारात घ्यावयाच्या बाबी

१. सर्वसाधारणपणे १५ फेब्रुवारी पर्यंत तुटलेल्या ऊसाचाच खोडवा ठेवणे फायदेशीर ठरते. त्याच्यानंतर खोडवा घेतल्यास खोड किडींचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर होतो. २. ज्या ऊस लागणीच्या उसाचे उत्पादन हेक्टरी १०० टन आणि ऊस संख्या एक लाखापेक्षा जास्त आहे, अशा उसाचाच खोडवा ठेवावा. ३. ऊस पीक विरळ झाल्यास नांग्या भराव्यात. नांग्या भरण्यासाठी प्लास्टिकच्या / पॉलिट्रेमधील तयार केलेली रोपे वापरावीत. किवा सुपरकेन नर्सरीचे तंत्रज्ञान वापरावे. ४. खोडवा पीक हे हलक्या, कमी खोलीच्या तसेच निचरा न होणाऱ्या क्षारपड अथवा चोपण जमिनीत घेऊ नये. ५. शिफारस केलेल्या ऊस जातींचाच खोडवा ठेवावा.

# सूर्यफुलाच्या शेतीतून मिळवा बंपर नफा

सूर्यफूल हे एक महत्त्वाचे तेलबिया पीक म्हणून आहे. हे तेल हृदयरोग्यांसाठी चांगले मानले जाते. हे एक पीक आहे जे वर्षभर घेतले जाऊ शकते. उत्तर भारतात ते फेब्रुवारी ते जून दरम्यान वसंत ऋतूमध्ये घेतले जाते. त्याच्या बियांमध्ये ४०-५० टक्के तेल आढळते. या तेलात कोलेस्टेरॉल नसते. सूर्यफूलाचा कित्येक प्राणी आणि कोंबड्यांसाठी चांगला आहार आहे. अशा परिस्थितीत शेतकरी शेती करून चांगला नफा मिळवू शकतात.

लागवड योग्य माती : सूर्यफुलाची लागवड सर्व प्रकारच्या जमिनीत करता येते. पण योग्य पाणी निचरा होणारी आणि चिकट मातीपेक्षा जड माती चांगली मानली जाते. जमिनीची पाणी धारण क्षमता आणि सेंद्रिय पदार्थांचे प्रमाण चांगले असावे. सर्वसाधारण: खरीपातील बिगर सिंचन क्षेत्रात आणि रब्बीत बागायत क्षेत्रात हे पीक घेतले जाते. अधिक उत्पादन देणाऱ्या प्रजाती : सूर्यफुलाच्या लागवडीसाठी हेक्टरी ५ ते ६ किग्रॅ. संकरित आणि ७-८ किग्रॅ. सामान्य प्रजातींचे बियाणे आवश्यक आहे. पेरणीपूर्वी बियाणे १२ तास पाण्यात भिजवून ३-४ तास सावलीत ठेवावे. तसेच पाण्यात २ टक्के झिंक सल्फेट मिसळावे. असे केल्याने पाण्याचा साठा सुधारतो आणि दुष्काळ सहन करण्याची क्षमताही वाढते. याशिवाय झाडाला विविध रोगांपासून वाचवता येते.

पेरणीची वेळ : सूर्यफुलाच्या वसंत ऋतूतील पिकाच्या पेरणीसाठी योग्य वेळ फेब्रुवारीचा पहिला ते दुसरा पंधरवडा आहे. परंतु मार्चच्या पहिल्या ते



दुसऱ्या पंधरवड्यापर्यंत त्याची पेरणी करता येते. पेरणी उशिरा केल्यास, पीक उशिरा पिकते आणि पावसाळ्यात पाऊस सुरू होतो. ज्यामुळे कापणी आणि काढणीमध्ये अडचणी येतात. त्यामुळे फेब्रुवारीच्या अखेरीस पिकाची पेरणी करणे आवश्यक आहे. सामान्य आणि बौने जातींसाठी नेहमी ४५ सेमी अंतरावर ओळीत पेरणी करा. आणि संकरित आणि उंच प्रजाती ६० सेंटीमीटरच्या उंचीवर लावल्या जातात. चांगल्या अंतरावर पेरणी करा. रोप आणि रोपांमधील दुसरे अंतर २०-३० सेमी असावे. बियाण्याची खोली ३-४ सें.मी. असावी. पेरणीनंतर १५-२० दिवसांनी पातळ करणे आवश्यक आहे आणि झाडांमधील अंतर २०-३० सेंटीमीटरपर्यंत कमी करावे.

खत व्यवस्थापन : सूर्यफुलाच्या यशस्वी लागवडीसाठी ८०-१२० कि.ग्रॅ. नायट्रोजन, ६० किग्रॅ. स्फुरद आणि ४० कि.ग्रॅ. हेक्टरी पोटॅश लागते. पेरणीच्या वेळी अर्धा नत्राची मात्रा आणि उरलेली मात्रा दोन समान भागांमध्ये विभागून एक भाग उभ्या पिकावर २-०२५ दिवसांनी आणि दुसरा भाग ३५-४० दिवसांनी किंवा पहिले व दुसरे पाणी दिल्यानंतर शिंपडा. स्फुरद व पालाशची संपूर्ण मात्रा पेरणीच्या वेळी द्यावी. पेरणीच्या वेळी २०० किलो/हेक्टर जिप्सम वापरण्याची खात्री करा किंवा स्फुरद सिंगल सुपर फॉस्फेटच्या स्वरूपात द्या. त्यामुळे झाडांना सल्फर तत्वाची उपलब्धता वाढते आणि धान्यांची चमक वाढते. सल्फरमुळे तेलाचे प्रमाणही वाढते.

सिंचन व्यवस्थापन : सूर्यफुलाच्या लागवडीदरम्यान सिंचनाला खूप महत्त्व आहे. अशा स्थितीत पेरणीनंतर २०-२५ दिवसांनी पहिले पाणी द्यावे. त्यानंतर साधारणपणे १५ ते २० दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. तसेच फुल आणि दाणे तयार होण्याच्या वेळी शेतात ओलावा नसताना ४-५ पाणी देणे आवश्यक आहे.

पीक कापणी : जेव्हा सुर्यफूल मुंडकाची मागील बाजू तपकिरी पांढरी होऊ लागते. तेव्हा पिकाचे मुंडक कापून ५-६ दिवस कडक उन्हात वाळवले जातात आणि दाणे काठीने मारून बाहेर काढले जातात. आजकाल बाजारात सूर्यफूल थ्रेशर उपलब्ध आहे. त्यामुळे सूर्यफूलाची मळणी करता येते.

उत्पन्न : सूर्यफुलाची लागवड केल्यास हेक्टरी २२-२८ क्विंटल बियाणे उत्पादन घेता येते. यामुळे शेतकऱ्यांना यातून चांगले आर्थिक उत्पन्न मिळू शकते.

## थोडक्यात



### रोहित क्षीरसागर यांच्या हस्ते विविध ठिकाणी ध्वजारोहन

बीड : भारतीय स्वातंत्र्याच्या प्रजासत्ताक दिनानिमित्त औषध निर्माणशास्त्र महाविद्यालय बीड, सौ.के.एस.के.(काकू) अन्न तंत्रज्ञान आणि कृषि महाविद्यालय बीड, तालुका दुध संघ मंजेरी फाटा, पिंपळवाडी हायस्कुल पिंपळवाडी येथे युवा नेते रोहित क्षीरसागर यांच्या हस्ते ध्वजारोहन संपन्न झाले. ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त युवा नेते रोहित क्षीरसागर यांच्या हस्ते औषध निर्माणशास्त्र महाविद्यालय बीड, सौ.के.एस.के.(काकू) अन्न तंत्रज्ञान आणि कृषि महाविद्यालय बीड, तालुका दुध संघ मंजेरी फाटा, पिंपळवाडी हायस्कुल पिंपळवाडी येथे ध्वजारोहन संपन्न झाले. यावेळी श्री अनंत कृषि विकास प्रतिष्ठान बीडचे सहसचिव डॉ.गोविंद साळुंके, तालुका दुध संघाचे अध्यक्ष विलासराव बडगे, कार्यकारी संचालक सतीष श्रीखंडे, प्रा.सुरेंद्र कुटे, मुख्याध्यापक प्रदिप जगताप, श्री गजानन नागरी सहकारी बँकेचे संचालक अर्जुन बहिरवाळ, पिंपळवाडीचे सरपंच शोभाताई बहिरवाळ, गणेश बहिरवाळ, सुभाष बहिरवाळ, महादेव पाटील, विश्वास पाटील, सय्यद शाहेद, कल्याण ठोकळ, शिवप्रसाद कळसाने, योगेश पवार, राजाभाऊ नहिराळे, संतोष वाघुले, शामराव कलढोणे, पठाण सलमान, शेख शब्बीर, मधुकर पाटील, श्रीरंग खटाणे, संभाजी पाटील, संजय बहिरवाळ, बाळासाहेब कळसाने, पठाण अफसर, लिंबाजी पाटील यांच्यासह ग्रामस्थ, विविध संस्थेचे अधिकारी, पदाधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.



### गजानन विद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

राजुरी : येथील गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात भारतीय स्वातंत्र्याचा ७६ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेचे ध्वजारोहन प्राचार्य केशव भांगे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रजासत्ताक दिनानिमित्त सकाळी विद्यार्थ्यांची गावातील मुख्य रस्त्यावरून प्रभातफेरी काढण्यात आली. त्यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांनी आणि उपमुख्याध्यापक शिंदे एस.एस., पर्यवेक्षक दगडे व्ही.एन., शेख एस.वाय., भोसले बी.एस. यांनी आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप करतांना प्राचार्य केशव भांगे यांनी प्रजासत्ताक दिनाचे महत्व सांगून सर्वांना शुभेच्छा दिल्या. यावेळी से.स.सो.चेअरमन अनिल बहीर, माजी सरपंच दत्तात्रय टुले तसेच मारूती वाघ, बाबुराव जमदाडे, ज्ञानेश्वर केंडे, वैजिनाथ बनकर, लक्ष्मण पांढरे, सचिन पवार, विनोद पवार, राहुल टुले यांच्यासह ग्रामस्थ, गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जयदीप सरवदे यांनी केले तर सुत्रसंचालन कु.हर्षदा कसपटे, ऋतुजा राहिंज यांनी केले. शेवटी माणिक अनुसे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### अनुदान तत्वावर शेळीगट वाटप;३१ जानेवारी पूर्वी अर्जाचे आवाहन

बीड: जिल्हा समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद बीडमार्फत सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात २० टक्के जिल्हा परिषद सेस निधीतून मागासवर्गीय लाभार्थ्यांना १०० टक्के अनुदान तत्वावर शेळी गट वाटप करण्यासाठी अर्ज मागविण्यात आले आहेत. हे अर्ज पंचायत समितीमध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. अर्ज जमा करण्याची अंतिम तारिख ३१ जानेवारी २०२५ असून कार्यालयीन वेळेत अर्ज सादर करावेत. लाभार्थ्यांची निवड तालुका निहाय लकी ड्रॉ पध्दतीने केली जाईल तरी सर्व तालुक्यातील पात्र मागासवर्गीय लाभार्थ्यांनी अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा परिषदेचे जिल्हा समाज कलयाण अधिकारी यांनी केले आहे.

### बेपत्ता व्यक्तीबाबत निवेदन

बीड : बापू धोंडीबा कोरडे, राहणार कोरडेवाडी, तालुका केज, जिल्हा बीड यांनी पोलीस स्टेशन केज जेथे तक्रार दिले आहे की, त्यांचा मुलगा विरेंद्र बापू कोरडे, वय ३५ वर्षे हा दिनांक ३०. ६.२०२४ रोजी रात्री ११.०० वाजता घरातून कोणाला काही न सांगता निघून गेला आहे तो अद्यापपर्यंत घरी आलेला नाही. मित्रास व नातेवाईकांना विचारपूस केली असता त्याचा शोध घेतला परंतु मिळून आला नाही त्याचे वर्णन खालील प्रमाणे आहे. रंग सावळा, उंची साडेपाच फूट, कपडे लाल रंगाचा शर्ट, पांढरी पॅन्ट, पायात चप्पल, भाषा मराठी, हिंदी तरी वरील वर्णनाची व्यक्ती कुणास आढळून आल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा,असे आवाहन केज पोलीस ठाण्याचे पोलीस तपासी अंमलदार एम.बी. सोनवणे यांनी केले आहे. संपर्कसाठी पत्ता पोलीस स्टेशन केज, फोन क्रमांक ० २४४५-२९५१०० पोलीस चौकी अंमलदार एम.बी. सोनवणे, पोलीस स्टेशन केज मोबाईल क्रमांक ९९२२४४२२३० यावर माहिती कळवावी.

### प्रजासत्ताक दिनी सात गाव अंधारात , महावितरणचा भोंगळ कारभार :आमटे

बीड। प्रतिनिधी

खांडे पारगाव परिसरातील सात गाव तीन ते चार दिवसा पासून अंधारात आहेत राष्ट्रीय सन प्रजासत्ताक दिनी सुधा सात गाव अंधारात महावितरणच्या भोंगळ कारभाराने सात गावातील शेतकरी नागरिक त्रस्त झाले आहेत. शेतकऱ्याची पीक करपून गेली आहे. गावात लाईट नसल्याने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. पुढील महिन्यात १० वी १२ वी परीक्षा आहेत मुलांना अभ्यास करता येत नाही. लाखो रुपये खर्च करून हि आमच्या मुलाचं भविष्य अंधारात का? सात गावात लाईट नसल्याने पाणी पंप, पिठाच्या गिरण्या, बंद आहेत नागरिक हैराण झाले आहेत.खांडे पारगाव परिसरातील खांडे पारगाव, अंथरवन प्रिंप्रि, नागपूर खुर्द, उमरी, नागपूर बुद्रुक, उमरद खालसा, अंथरवन प्रींप्री या सात गावात मागील तीन चार दिवसांपासून लाईट नाही प्रजासत्ताक दिनी सात गाव अंधारात महावितरण कंपनीने तत्काळ सात गावातील विद्युत पुरवठा सुरळीत करण्यात यावा सात गावातील विद्युत तारा नवीन टाकाव्यात, सात गावच्या पाठपुराव्याने मंजूर नवीन ५ ट्रान्सफॉर्मर बसवण्यात यावा शेतकऱ्यांना उच्च दाबाने विद्युत पुरवठा करावा अन्यथा सात गावातील शेतकरी नागरिक महिला सह शाळकरी विद्यार्थी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा अधीक्षक अभियंता कार्यालयात महावितरण जालना रोड येथे निवेदन देऊन देण्यात येत आहे या वेळी शिवसंग्राम शेतकरी जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे, नागपूर खुर्द आदीच्या वतीने इशारा देण्यात येत आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल व छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण समस्याच्या विळख्यात

## प्रजासत्ताक दिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन; क्रिडामंत्री दत्तात्रय भरणे यांना निवेदन







बीड। प्रतिनिधी

खेळाडूंना आपल्याकडे असलेल्या खेळातील कौशल्याला पुढे संधी मिळावी आणि त्यामधून खेळाडू निर्माण व्हावेत या उद्देशाने क्रिडा संकुलांची निर्मिती करण्यात आली.खेळाडुंसाठी उपयुक्त ठरणारे बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल आणि छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण समस्यांच्या विळख्यात असुन संबंधित यंत्रणांचे दुर्लक्ष आणि नियमित देखभाल करण्याकडे दुर्लक्ष यामुळे

खेळाडुंना असुविधेचा सामना करावा लागत आहे. क्रिडा संकुलाच्या विकासासाठी शासनाकडून मोठ्या प्रमाणात मंजूर करण्यात आलेला निधी जिल्हा प्रशासनाच्या उदासीनतेमुळे बीड जिल्ह्यातील ११ तालुक्यातील क्रिडांगणाची विकास कामे रखडलेल्या अवस्थेत आहेत.

त्यामुळे क्रिडा संकुलाच्या विकासासाठी आवश्यक निधी देण्यात यावा. आणि रखडलेली कामे पूर्ण ताकडीने पुर्ण करण्यात यावीत. क्रीडा अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्यात यावीत. पावसाळ्यात छत्रपती शिवाजी महाराज क्रिडा संकुलात पाणी साठल्याने निचरा होत नसल्याने खेळाडुंची अडचण होते.आणि छत्रपती संभाजी महाराज क्रिडा संकुलावर घेण्यात येणा-या राजकीय कार्यक्रमांवर निर्बंध आणावेत या मागण्यांसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली दि.२६ प्रजासत्ताक दिनी जिल्हाधिकारी कार्यालया समोर धरणे आंदोलन करण्यात येऊन क्रिडा मंत्री महाराष्ट्र राज्य दत्तात्रय भरणे यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनातील मुद्यांबाबत सकारात्मक कार्यवाही करण्याचे आश्वासन क्रिडा मंत्र्यांनी दिले.यावेळी आंदोलनात शेख युनुस, रामनाथ खोड, शेख मुबीन ,शिवशर्मा शेलार आदी सहभागी होते.

छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगणाची दुरावस्था झाली असुन नगरपरिषदेमार्फत नियमित स्वच्छतागृहांची साफसफाई करण्यात येत नसल्याने सकाळी आणि सायंकाळी व्यायामासाठी येणाऱ्या नागरिकांना दुर्गंधीचा सामना करावा लागतो. सुरक्षा रक्षक नसल्याने रात्री अपरात्री त्याठिकाणी अवैध धंदे चालतात,दारुड्यांचा राबता असतो. व्यायामासाठी बसविण्यात आलेले लोखंडी साहित्याची मोडतोड झाली असुन याकडे नगरपरिषद प्रशासनाचे दुर्लक्ष आहे. तसेच या क्रिडांगणावर राजकीय सभा व इतर कार्यक्रमांमुळे क्रिडांगणाची दुरावस्था होत असुन या कार्यक्रमांवर निर्बंध घालण्यात यावेत.हे क्रिडांगण खेळासाठी आरक्षित आहे. खेळाव्यतिरिक्त कोणत्याही कार्यक्रमास परवानगी देण्यात येऊ नये अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

## स्वतः तील सुप्त गुणांना ओळखून त्याना प्राधान्याने विकसित करा-प्रा.संभाजी तांगडे

जालना । प्रतिनिधी

घनसावंगी संत रामदास महाविद्यालयात आयोजित वार्षिक स्नेह समेलनाच्या समारोप कार्यक्रमाच्या वेळी प्रमुख पाहुणे प्रसिद्ध नाट्य कलाकार, शाहीर प्रा. संभाजी तांगडे यांनी असे प्रतिपादन केले कि जीवनात यशस्वी होण्याकरिता स्वतःच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना ओळखून त्यांना प्राधान्याने विकसित करा यातून एक यशस्वी व्यक्तीमत्व साकारले जाते असे त्यांनी सांगितले. यावेळी व्यासपीठावर स्वामी रामानंद शिक्षण सचिव श्री. विनायक चोथे, श्री. रमेशदादा तौर, श्री. रानोजी तौर, श्री. महादेव काळे, प्रा. चत्रभूज गोडबोले, विद्यार्थी प्रतिनिधी ज्ञानेश जाधव विद्यार्थिनी प्रतिनीधी प्रांजल पुराणिक, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. गजानन अवचार, श्री भगवान मिरकड, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. मारोती घुगे व क्रीडा विभागप्रमुख डॉ. बाप्पासाहेब मस्के आदी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात नटराज पूजनाने करण्यात आली व त्यानंतर महाराष्ट्र



गीत गायन करण्यात आले. सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ. संतोष आडे यांनी केले तर डॉ. अवचार व ज्ञानेश जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. मारोती घुगे व आभार प्रदर्शन प्रा. जमिलखा पठाण यांनी केले.पुढे बोलतांना ते म्हणाले कि आपल्या अंगी अभ्यासा शिवाय अनेक गुण दडलेले असतात फक्त त्यांना ओळखून विकसित करता आलं पाहिजे. कोणतेही गुण किंवा कला ही जन्मताहा कोणाच्या अंगी विकसित नसते तिला आपल्या कष्ट आणि मेहनतीच्या सांगड घालून विकसित करावे लागते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये अनेक गुण असतात फक्त त्यांना संधी मिळाली कि तिचे सोने करून योग्य दिशा देता आली पाहिजे असे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी शेतकऱ्याच्या परिस्थिती वर प्रकाश टाकणारा पोवाडा सादर करून सर्वांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाचा अध्यक्षिय समारोप श्री विनायक चोथे यांनी केला. त्यांनी सांगितले कि महाविद्यालय ही विद्यार्थ्यांची संपत्ती असून तिचा योग्य वापर करून त्यांनी सर्वांगीन विकास विद्यार्थी दशेत केला पाहिजे. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात राबविण्यात येणाऱ्या सर्व उपक्रमात सहभाग नोंदवून आपलं व्यक्तिमत्व घडवलं पाहिजे. सदरील महाविद्यालय विद्याच्याँच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सदैव तत्पर असते फक्त गरज आहे विद्यार्थ्यांनी हिरेरीने सहभाग नोंदवण्याची, यावेळी सांस्कृतिक विवीध कार्यक्रमात, स्पर्धेत तसेच क्रीडा स्पर्धेत सहभागी व यशस्वी विद्यार्थ्यांचा पदक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रम यशस्वी ते करिता सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले.

## सुभद्राबाई माध्यमिक विद्यालयात, प्रजासत्ताक दिन उत्साहात



बीड। प्रतिनिधी

श्रीनाथ शिक्षण प्रसारक मंडळ कोरडेवाडी ता केज जि बीड संचालित, सुभद्राबाई माध्यमिक विद्यालय,नगर रोड बीड,येथे दि.२६/०१/२०२५ रोजी प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला, सर्वप्रथम विद्येची देवता सरस्वती,राष्ट्र पिता महात्मा गांधी,महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर,नेताजी सुभाष चंद्र बोस, कै, प्रतापराव (नाना)राख यांच्या प्रतिमांचे पुजन, कार्यक्रमाचे आध्यक्ष श्रीमाती मुंडे ए,एम, (मु,अ,) व प्रमुख पाहुणे ,संस्थेचे सदस्य राख ओम प्रतापराव, माझी स्वातंत्र्य सैनिक मा श्री त्रिंबक सानप,ज्ञानधान गुरुकुल बीड चे श्री पवार सर, श्री पाळवदे एम बी,सर्व मान्यंवर, शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले.ध्वजारोहन मा.श्री राख ओम प्रतापराव व माझी स्वातंत्र्य सैनिक त्रिंबक सानप यांच्या हस्ते करुन स्वागत गिताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.विद्यालयाच्यावतीने सर्व मान्यंवरांचे शाल,श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले,प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमात विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सामुहिक कवायत,लेझिम, गित,मनोगत,देशभक्तीपर गिते सादर करुन कार्यक्रमाची शोभा वाढवली.

शाळेतीळ शिक्षक, श्री यादव एम,एस, ,यांनी प्रास्तविकामध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी विद्यालयात राबविण्यात आलेले विविध उपक्रम,क्रिडा स्पर्धा,सामाजिक उपक्रम,विद्यालयाची प्रगती इ.माहिती दिली व ज्ञानधान गुरुकुल संचालक श्री पवार सर यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले सर्वांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा, दिल्या.कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीमाती मुंडे ए,एम,यांनी प्रजासत्ताक दिनाचे महत्व विशद करुन विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले.तसेच विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात सादर केलेल्या सामुहिक कवायत,देशभक्तीपर गिते,,लेझिम,मनोगत इ.सांस्कृतिक कार्यक्रमाचे कौतुक केले,प्रजासत्ताक दिनानिमित्त विद्यालयात घेण्यात आलेल्या विविध क्रिडा स्पर्धाचे बक्षिस वितरण मान्यंवरांच्या हस्ते करण्यात आले, प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमास .श्री,भोसले एन,डी, श्री डोईफोडे एस,आर.श्री धस एस सी श्री हंगे पी,एस, नागरगोजे आर,डी,श्रीमाती मस्के एम बी, खटाने ए, आर श्री राऊत जे,पी, श्री बहिरवाल बी, सिरसाट, परिसरातील नागरिक,पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन विद्यालयातील श्रीमाती.चौरे पी,सी.यांनी केले.तर आभार श्रीमाती.नागरगोजे एस,आर, यांनी मानले.प्रजासत्ताक दिन अत्यंत उत्साहाच्या वातावरणात खाऊ वाटप करून संपन्न झाला.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले.

## रविशंकर विद्या मंदिर येथे प्रजासत्ताक दिन

बीड। प्रतिनिधी

श्री श्री रविशंकर विद्या मंदिर येथे दिनांक २६ जानेवारी २०२५ वार रविवार रोजी प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला या कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजनाने झाली. या कार्यक्रमासाठी शाळेचे अध्यक्ष श्री पारगावकर सर ,श्रीमती स्नेहा पारगावकर मॅडम ,सचिव पाशा सर , उप मुख्याध्यापिका श्रीमती अनिता सूर्यवंशी मॅडम, श्री अनिल नाना धांडे, निवृत्त पोलीस अधिकारी पालवे सर आणि सर्व शिक्षक वृंद आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने शाळेमध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले यामध्ये डंबेल्स ,लेझीम ,देशभक्तीपरगीते तसेच वंदे मातरम या गीतावर विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केले आणि आणि या नृत्याची निवड झाली आणि पोलीस ग्राउंड वर हे नृत्य आपल्या शाळेतील विद्यार्थिनींनी उत्कृष्ट सादर केले. तसेच आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांनी अगदी छोटा गट ते इयत्ता आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी भाषणे सादर केली यामध्ये हिंदी ,इंग्रजी, संस्कृत आणि मराठी इत्यादी भाषांचा समावेश होता. चिमुकल्याच्या भाषणांनी श्रोते मंत्रमुग्ध झाले.

तसेच निल ज्योती सेवाभावी संस्थेमध्ये मार्फत 'जीनियस ऑफ द इयर 'परीक्षा घेण्यात आली होती त्या परीक्षेतील विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक आणि प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. यामध्ये तिसरी ते चौथी गट यामध्ये प्रथम क्रमांक संभाजी वाघमारे द्वितीय क्रमांक आदित्य भास्कल तृतीय क्रमांक शौर्य टाक तसेच पाचवी ते सातवी गटात प्रथम क्रमांक शिवराज घरत सार्थक सुरवसे द्वितीय क्रमांक तृतीय क्रमांक अर्णव फसले या विद्यार्थ्यांना मिळाला तसेच आठवी ते दहावी गटात प्रथम क्रमांक समर्थ शेटे द्वितीय क्रमांक अनुज जोशी तृतीय क्रमांक स्वराज भुजबळ या विद्यार्थ्यांना मिळाला यामध्ये उत्तेजनार्थ बक्षीस पण विद्यार्थ्यांना देण्यात आली.

## जोशी यांच्याकडे रामदास स्वामींच्या पादुकांचे पूजन

बीड। प्रतिनिधी

सज्जनगडावरील श्री रामदास स्वामी यांच्या पादुका चंपाषष्ठीपासून भिक्षाफेरीसाठी व धर्माच्या प्रचारार्थ आणि वर्षभर गडावर लागणाऱ्या साहित्य जमा जमवण्यासाठी जिल्ह्यामध्ये जातात . या दोन महिन्याच्या फेरी मध्ये संपूर्ण जमलेले साहित्य हे सज्जनगडावर अन्नदान गोशाळा तसेच विविध धार्मिक कार्य चालू असते यासाठी या फेरीत जमा झालेले अन्नधान्य तसेच रोख स्वरूपातील देणगी वापरली जाते . ही रामदास स्वामींची फेरी सातारा ,सहकार नगर पुणे, कोथरूड पुणे,संभाजीनगर, जालना व काल बीड येथे स्वामींच्या पादुकांचे आगमन झाले. बीड येथील यशवंत नगर मधील तुकाराम पंत जोशी यांच्याकडे काल दिनांक २५/ १/ २०२५ शनिवारी ५ वाजता मंत्र उच्चारात रामदास स्वामींचे सेवेकरी चैतन्य महाराज इनामदार यांनी मंत्र उच्चारत विधिवत पूजा केली. तसेच स्वामींचा दौरा व माहिती सविस्तर सांगितली या पाद्यपूजन सोहळ्यासाठी यशवंत नगर मधील तुकाराम पंत जोशी, सारंग जोशी, सौ ज्योती जोशी,सौ सुचिता जोशी यांच्यासह यशवंत नगर मधील भाविक भक्त व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. रामदास स्वामींच्या पादुकांचे स्वागत करण्यासाठी बँड पथक तसेच महिलांनी डोक्यावर तुळशी घेऊन पादुकांचे स्वागत केले.

# बालाजी बोबडे यांना कुलगुरुंच्या हस्ते पुरस्कार प्राप्त

बीड । प्रतिनिधी

अॅग्रोकेअर कृषीमंच संस्थेमार्फत २०२४ या वर्षाचा १६ वा राष्ट्रीय महा अॅग्रो आयडॉल पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात संपन्न झाला. या पुरस्काराचे वितरण डीपीडीसी हॉल, सेंट्रल बिल्डिंग, धाराशिव येथे दिनांक ७ जानेवारी २०२५ रोजी करण्यात आले. महाराष्ट्रातील कृषी संशोधक, कृषी विस्तारक, कृषी उद्योजक, शेतकरी, कृषी विभागातील अधिकारी यांना अॅग्रोकेअर संस्थेच्या माध्यमातून दरवर्षी सन्मानित करण्यात येते. या पुरस्काराच्या वितरण प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंद्र मणी हे उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून कृषि विद्यापीठ परभणीचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. गिरधारी वाघमारे, महाराष्ट्र शासन कृषी विभागाचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र माने, कृषी तंत्रज्ञान



व्यवस्थापन यंत्रणा आत्माचे प्रकल्प संचालक खंडेराव सराफ, कृषी विज्ञान केंद्र तुळजापूरचे प्रमुख डॉ. सचिन सूर्यवंशी, अॅग्रोकेअर ग्रुप ऑफ कंपनीजचे चेअरमन भूषण निकम, रोहिणी पाटील हे प्रमुख मान्यवर उपस्थित होते.

नुकत्याच पार पडलेल्या १६ व्या राष्ट्रीय महा अॅग्रो आयडॉल पुरस्कार वितरण सोहळ्यात बीड जिल्यातील बालाजी बोबडे यांना कृषीशिक्षण व विस्तार कार्याबद्दल वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंद्र मणी यांच्या हस्ते सहकुटुंब पुरस्कार देवून गौरविण्यात आले. मागील ७ वर्षापासुन कृषि क्षेत्रात अध्यापन व संशोधन प्रकल्पावर कार्य. बालाजी बोबडे यांचे ५ वी ते १० वी पर्यंतचे शिक्षण बीड जिल्यातील जवाहर नवोदय विद्यालय, गढी येथे झाले. १२ वी वसंतदादा पाटील कॉलेज, पाटोदा येथे झाली. त्यांनी पदवीचे शिक्षण शासकीय कृषी महाविद्यालय, लातूर येथून तर पदव्युत्तर पदवीचे शिक्षण कृषी हवामानशास्त्र या विषयात वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथून पूर्ण केले. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी डॉ. विखे पाटील संस्था अहिल्यानगर व आदित्य शिक्षण संस्था, बीड अंतर्गत कृषी महाविद्यालय, येथे सह्हायक प्राध्यापक म्हणून एकूण ३ वर्ष अध्यापनाचे कार्य केले. त्यानंतर त्यांची मुलाखतीद्वारे वनामकृवि, परभणी येथील कृषी हवामान शास्त्र विभागात वरिष्ठ सह-सहसंशोधक म्हणून निवड झाली तेथे त्यांनी प्रकल्पावर २ वर्ष कार्य केले. जानेवारी २०२३ पासून दीनदयाल शोध संस्थान कृषि विज्ञान केंद्र अंबाजोगाई येथे राष्ट्रीय हवामान संवेदनशील कृषी नवकल्पना (निक्रा) प्रकल्पावर वरिष्ठ सह-संशोधक या पदावर कार्यरत आहेत. कृषी विज्ञान केंद्राच्या माध्यमातून निक्रा प्रकल्पाच्या अंतर्गत हवामान बदलावर आधारित संवेदनशील शेती पद्धतीचे डोंगरभागातील दुर्गम व दुष्काळग्रस्त गावामध्ये विविध प्रात्यक्षिकासह पिक उत्पादनात वाढ करून शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. वसंत देशमुख व पिकविद्या शास्त्रज्ञ कृष्णा कर्डिले व सर्व शास्त्रज्ञांच्या मार्गदर्शनाखाली कार्य करतात. शेतकरी बैठक, पिक पाहणी, प्रशिक्षणद्वारे तसेच लेख, पिक फोटो व शेतकरी व्हिडिओच्या माध्यमातुन सोशल मीडियाचा प्रभावी वापर (व्हॉटसअप, फेसबुक, इंस्टाग्राम) करतात. त्यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल डॉ. संजय तांदळे ,विष्णू पन्हाळकर, कमलाकर तांदळे, राजकुमार राऊत ,नारायण जायभाये, प्रा. बाळासाहेब नागरगोजे ,पांडुरंग जायभाये, आत्माराम वाव्हळ आदींनी त्यांचे अभिनंदन केले.

# आमदार नमिता मुंदडा यांच्या पुढाकाराने अंबाजोगाई शहर बस सेवेला पुन्हा सुरुवात

अंबाजोगाई । प्रतिनिधी

मागील अनेक वर्षांपूर्वी बंद पडलेल्या अंबाजोगाई शहरातील बस सेवेला आ. नमिता मुंदडा यांच्या पुढाकाराने पुन्हा एकदा सुरुवात करण्यात आली आहे. प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून आ. मुंदडा यांच्या हस्ते बस सेवेचा शुभारंभ करण्यात आला.

अंबाजोगाई शहराचा वाढता विस्तार आणी नागरीकरण लक्षात घेता शहरांतर्गत बस सेवा अत्यावश्यक ठरत होती. स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयामुळे आजूबाजूच्या ग्रामीण भागातून अंबाजोगाईत येणाऱ्या रुग्णांची संख्या मोठी आहे. तसेच, अंबाजोगाई हे प्रमुख शैक्षणिक केंद्र असल्याने ग्रामीण भागातून शहरात येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या देखील अधिक आहे. सिटी बस अभावी रुग्ण आणि विद्यार्थ्यांना तुलनेत महागड्या असलेल्या खासगी वाहतुक व्यवस्थेवर अवलंबून राहावे लागत होते. त्यासोबतच शहर वाढल्याने नागरिकांनाही एका ठिकाणाहून दुसरीकडे जाण्यासाठी अल्पदरातील वाहतुक व्यवस्था आवश्यक होती. अंबाजोगाई शहरात अनेक वर्षांपूर्वी शहर बस सेवा कार्यरत होती, परंतु नंतर ती बंद करण्यात आली. रुग्ण, विद्यार्थी आणि नागरिकांची गरज लक्षात घेत आ. नमिता मुंदडा यांनी बंद पडलेली बस सेवा पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला. राज्य परिवहन विभागाचे बीड जिल्ह्यातील अधिकाऱ्यासोबत बैठक घेऊन त्यांनी शहर बस सेवा सुरू करण्याबाबत सूचित केले. त्यानुसार प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून आ. नमिता मुंदडा यांच्या हस्ते या बस सेवेला सुरुवात करण्यात आली. आ. मुंदडा यांनी स्वतः बसच्या पहिल्या फेरीतून प्रवेश केला.

### असा असणार मार्ग

शहर बस सेवा पिंपळा धायगुडा, भगवान बाबा चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, बस स्थानक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, सदर बाजार, स्वाराती रुग्णालय ते छत्रपती संभाजी महाराज चौक मोरेवाडी या दरम्यान सुरू राहणार आहे. सुरुवातीच्या टप्प्यात सकाळी साडेआठ ते दुपारी चार वाजेपर्यंत ही सेवा सुरू राहणार आहे. बसचे वेळापत्रक लवकरच जाहीर केले जाईल असे आगारप्रमुख राऊत यांनी सांगितले.



# आ.संदीप क्षीरसागरांनी घेतली मनोज जरांगे पाटलांची भेट



### मराठा आरक्षणाबाबतच्या मागण्या लवकरात लवकर मान्य करण्याची शासनाकडे विनंती

बीड । प्रतिनिधी

मराठा आरक्षणाच्या मागणीसंदर्भात मराठा संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांनी २५ जानेवारी रोजी उपोषण सुरू केले आहे. त्याठिकाणी जाऊन आ.संदीप क्षीरसागर यांनी रविवारी (दि.२६) रोजी मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. तसेच जरांगे पाटलांच्या मागण्या लवकरात लवकर मान्य करण्याची शासनाकडे विनंती केली आहे.

२५ जानेवारी पासून अंतरवली सराटी येथे मराठा संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणाच्या बाबतीत सगेसोयरे अंमलबजावणी, हैद्राबाद गॅझेट करण्याची मागणी घेऊन आंदोलन सुरू केले आहे. मराठा आरक्षणाच्या मागणीसंदर्भात मनोज जरांगे यांचे हे सातवे उपोषण आहे. बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी अंतरवली सराटी येथील उपोषणस्थळी जाऊन मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. तसेच त्यांना तब्येतीची काळजी घेण्याची विनंती केली. यासोबतच आ.क्षीरसागर यांनी जरांगे पाटलांच्या मागण्या तातडीने पूर्ण करण्यासाठी शासनाकडे पत्रव्यवहार केला आहे. मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांनी गेल्या अनेक दिवसांपासून मराठा समाजाच्या आरक्षणाबाबतच्या मागण्यांसाठी आंदोलन करत आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून वारंवार होत असलेले उपोषणामुळे त्यांची प्रकृती त्यांना साथ देत नाही. सद्यस्थितीलाही त्यांची प्रकृती खालावलेली आहे. त्यामुळे शासनाने त्यांच्या मागण्या लवकरात लवकर मान्य कराव्यात. अशी विनंती आ.संदीप क्षीरसागर यांनी शासनाकडे केली आहे. याबाबत आ.क्षीरसागर यांनी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे.





वडवणी: दै. राज्य लोकतंत्रचे संपादक तथा अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे राज्य उपाध्यक्ष गणेश मोकाशे यांना मुकनायक पुरस्कार मिळाल्याबद्दल वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने डिजिटल मिडिया परिषदेचे राज्याध्यक्ष अनिल वाघमारे, जेष्ठ मार्गदर्शक पत्रकार सुधाकर पोटभरे, परिषदेचे वडवणी अध्यक्ष सतिश सोनवणे यांनी यथोचित सत्कार व सन्मान केला. यावेळी भाजपचे नेते प्रा.सोमनाथराव बडे, माजी नगरसेवक आत्माराम जमाले पाटील, वारकरी संप्रदायाचे प्रमुख बब्रुवान शेंडगे पाटील, डॉ.मारोतराव आंधळे, शिवसेनेचे नेते अंगदराव जाधव पाटील, दै. राज्य लोकतंत्रचे कार्यकारी संपादक अशोक खाडे, उपसंपादक अनिल जाधव सह आदींची उपस्थिती होती. तसेच पत्रकार अर्जुन मुंडे, पत्रकार अविनाश मुजमुले, पत्रकार रामेश्वर गोंडे, मुख्याध्यापक सारूकते, नेमाटे, सुग्रीव खाडे यांनी सत्कार केला.



वडवणी: दै. राज्य लोकतंत्रचे संपादक गणेश मोकाशे यांना माजलगाव येथील एकता पत्रकार संघाचा मूकनायक पुरस्कार मिळाल्याबद्दल धारूर तालुक्यातील कारी येथील बप्पा गुळ उद्योग येथे उद्योजक बप्पासाहेब मोरे, अण्णासाहेब मोरे, बाळासाहेब मोरे यांनी सत्कार केला.

# दिग्गज मान्यवरांच्या उपस्थितीत मराठी पत्रकार परीषदेच्या पुरस्कार वितरण सोहळ्यास उपस्थित रहा –चौरे, उबाळे

बीड । प्रतिनिधी

**मराठी पत्रकार परिषद मुंबई, व परभणी जिल्हा मराठी पत्रकार संघ व सेलू तालुका मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आदर्श जिल्हा व तालुका पुरस्कार वितरण तसेच पत्रकार मेळावा दि. १ फेब्रुवारी रोजी परभणी जिल्हयातील सेलू येथे आयोजित केला आहे. या मेळाव्यास बीड जिल्हयातील तालुका पदाधिकाऱ्यांनी मोठया संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन विभागीय समन्वयक सुभाष चौरे व सचिव रवी उबाळे यांनी केले आहे.**





हा पुरस्कार कार्यक्रम साई नाट्यगृह सेलु येथे दि.१ फेब्रुवारी २०२५ रोजी भव्य आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख हे राहणार असून या कार्यकमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून परभणी जिल्हयाच्या पालकमंत्री मेघनाताई बोर्डीकर व सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाठ, विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस प्रा.सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूरभाई शेख, उपाध्यक्ष गोपी लांडगे, गणेश मोकाशे, हेमंत वनजू, अविनाश भांडेकर, चंद्रकांत बरदे, विभागीय सचिव दिपक कैतके, पी.पी.कुलकर्णी, रवी उबाळे, प्रदिप घुमटवार, शिखरचंद बागरेचा, मनोज खांबे, सचिन शिवशेट्टे, अमोल खरे, चंद्रकांत क्षीरसागर, राज्य प्रसिध्दी प्रमुख संदीप कुलकर्णी, सहायक राज्य प्रसिध्दी प्रमुख भरत निगडे, राज्य महिला आघाडी प्रमुख शोभा जयपूरकर, डीजीटल मिडिया परिषदेचे राज्यप्रमुख अनिल वाघमारे, , डीजीटल मिडिया परिषद कार्याध्यक्ष सनी शिंदे, डीजीटल मिडिया प्रमुख परिषद उपाध्यक्ष अनिल उंबरकर आदींची प्रमूख उपस्थिती राहणार आहे. या मेळाव्यास बीड जिल्हयातील पत्रकार बांधवांनी सेलू येथे सकाळी ९.३० वाजता उपस्थित राहून परिषदेने आयोजित केलेल्या एकता रॅलीस सहभागी व्हावे असे आवाहन बीड जिल्हा मराठी पत्रकार परिषदेचे संभाजीनगर विभागीय समन्वयक सुभाष चौरे, विभागीय सचिव रवी उबाळे यांनी केले आहे.

# कापशी गावकऱ्यांना आम्ही काय पीओकेमध्ये राहतो काय असे म्हणण्याची वेळ

आष्टी । प्रतिनिधी

कापसी हे आष्टी तालुक्यातील डोंगरात वसलेले अतिशय दुर्गम गांव. तेथील बहुतेक लोक शेती हा व्यवसाय करतात. शेती हा व्यवसाय असल्याने लोकांना रात्री अपरात्री शेतात पाणी द्यावे लागते. आजूबाजूला डोंगर असल्याने रानडुक्कर, बिबटया असे वण्यप्राणी तेथे रहवास करतात. काही अनुचित प्रकार घडल्यास कोणत्याही मोबाईलची रेंज नसल्याने एकमेकांना संपर्क करता येत नाही. कसल्याही प्रकारची रेंज नसल्याने गावाला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. शाळेमधील अनेक ऑनलाईन कामे ही रेंजमध्ये जाऊन करावी लागतात. शाळेतील विद्यार्थ्यांना



ऑनलाइन प्रशिक्षण देणे शक्य होत नाही. तसेच कोणी आजारी असल्यास रुग्णवाहिकेला संपर्क करता येत नाही. ग्रामपंचायत मधील ऑनलाईन दाखले देणेही शक्य होत नाही. गावाला अशा अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याने कापसी गावाचे लोकनियुक्त सरपंच श्री. बाळासाहेब गर्जे, सामाजिक कार्यकर्ते यमाजी खंडागळे, गोरख खंडागळे, भाऊसाहेब गर्जे, इंद्रजित गर्जे, पोपट गोल्हार, महादेव गोल्हार, विष्णू कुऱ्हाडे, गणेश कुऱ्हाडे, प्रविण सोनवणे आदी लोकं गावात कोणत्याही प्रकारचे मोबाईल नेटवर्क नसल्याने कापसी येथील मारुती मंदिरात सोमवार दि.२७ जानेवारीपासून आमरण उपोषणास बसले आहेत. प्रशासनाने आमची मागणी लवकरात लवकर पूर्ण करावी. प्रशासन आमची मागणी जोपर्यंत पूर्ण करत नाही तोपर्यंत उपोषण सुरु राहील असा निर्णय उपोषणकर्त्यांनी घेतला आहे.

# आष्टीमध्ये ७६ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा

आष्टी । प्रतिनिधी

तहसील कार्यालयामध्ये तहसीलदार वैशाली पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण तर छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये १११ फूट उंचीच्या तिरंग्याचे ध्वजारोहण शहरातील ज्येष्ठ नागरिकांच्या व आमदार सुरेश धस यांच्या हस्ते ध्वजारोहून संपन्न ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त आष्टी शहरांमध्ये नगरपंचायत कार्यालय तहसील कार्यालय पंचायत समिती कार्यालय इतर शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये व पत्रकार भावनांमध्ये ७६ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला तहसील कार्यालयामध्ये ध्वजारोहण संपन्न झाल्यानंतर आष्टी कन्या प्रशाला मुलींच्या शाळेच्या विद्यार्थिनींनी आम्ही शिवबाच्या लेकी हे गीत मोठ्या उत्साहामध्ये सादरीकरण केले



◀◀ पान ३ वर



# चौसाळा बसस्थानकात पाणपोईचा शुभारंभ

चौसाळा । प्रतिनिधी

बीड तालुका येथील चौसाळा शहरात २६ जानेवारी निमित्त साधून माई कलेक्शन चे प्रो.प्रा भारत चौधरी व उत्कर्ष दाताचे दवाखाना चे.डॉ. जयेश विश्वेकर यांच्या संयुक्त विद्यमाने प्रवाशांना व नागरिकांना दैनंदिन मोफत जारचे पाणी पिण्याची व्यवस्था करण्यात आली आहे त्याप्रसंगी मुक्ताई एक्का कुल वॉटर चे विठ्ठल काका नाईकवाडे सुरेश नाना हुलजुते डॉ. दिलीप मोटे. ज्ञानोबा नाईकवाडे भारत

◀◀ पान ३ वर

# जिल्हा वाहतूक शाखेची अंबाजोगाई शहरात कारवाई;९५ केसेस करून ७२ हजाराचा दंड



अंबाजोगाई । प्रतिनिधी

**बीड जिल्हा वाहतूक शाखेच्या वतीने पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, जिल्हा वाहतूक शाखेचे स.पोलीस.नि. सुभाष सानप, अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्याचे पो. नि. घोळवे यांच्या मार्गदर्शनाखाली अंबाजोगाई शहरांमध्ये कारवाई करून बुलेटचे आठ सायलेन्सर काढून जप्त केले याबरोबरच ९५ केसेस करून ७२ हजाराचा दंड केला. ही कारवाई सोमवारी शिवाजी चौक, तथागत चौक आदी भागात करण्यात आली.**

बीड जिल्हा वाहतूक शाखेने सुभाष सानप यांच्या मार्गदर्शनाखाली अंबाजोगाई शहरात वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर, ग्रेड पोलीस उपनिरीक्षक हनुमंत घोडके, वाहतूक शाखेचे पोलीस हवालदार क्षीरसागर, जावळे, दराडे, काकडे ,चालक पोलीस

◀◀ पान ३ वर

# गंगाई–बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार जाहीर

### पांडुरंग जाधव,अशोक जोशी, हनुमंत गावडे, सोपानराव निंबोरे,निसार शेख, विजयकुमार गाडेकर, अशोक भांडेकर,हमिद पठाण, शरद तळेकर, बापू खैरे, शबनम काझी, प्रतिक्षा मेश्राम, अशोक डोके,भंडारी,सानप,आदक, भोपळे यांच्यासह आदींचा समावेश















म्हसोबावाडी । प्रतिनिधी

**आष्टी मतदार संघाचे माजी आमदार तथा शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक–अध्यक्ष भीमराव धोंडे यांचे माता–पिता यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आयोजित या वर्षीच्या (एकविसावा) गंगाई बाबाजी महोत्सव २०२५ मधील विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना देण्यात येणाऱ्या गंगाई– बाबाजी आदर्श पुरस्कारांची घोषणा नुकतीच करण्यात आल्याची माहिती या महोत्सवाचे संकल्पक माजी आमदार भीमराव धोंडे तसेच संयोजन समितीचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ यांनी दिली.**

आष्टी येथील भगवान महाविद्यालयाद्वारा आयोजित हा महोत्सव ३० जानेवारी ते १ फेब्रुवारी २०२५ या कालावधीमध्ये संपन्न होत आहे. गुरुवार दि ३० जानेवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता माजी मंत्री सुरेश नवले यांच्या प्रमुख उपस्थितीत व माजी आ भीमराव धोंडे यांच्या अध्यक्षतेखाली उद्घाटन सोहळा संपन्न होणार आहे.उद्घाटनानंतर याच दिवशी महाविद्यालयीन वक्तृत्व व काव्यवाचन स्पर्धा घेण्यात येतील. शुक्रवार दि. ३१ जानेवारी रोजी सकाळी १० ते ५ या वेळेत महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित केलेले आहे. शनिवार दि १ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता गंगाई बाबाजी आदर्श पुरस्कार विधानपरिषदेचे

◀◀ पान ३ वर

# भावठाणा येथे शिवकथा व परमरहस्य पारायण सोहळा

दिंद्रुड । प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यातील भावठाणा येथील श्रीक्षेत्र भावनाथेश्वर मंदिर प्रांगणात संतशिरोमणी मन्मथ स्वामी जन्मोत्सवाच्या औचित्याने शिवकथा ज्ञानयज्ञ व परमरहस्य पारायण सोहळ्याचे आयोजन वीरशैव समाजाच्या वतीने करण्यात आले आहे. राज्यभरातून शिवभक्त परायण कीर्तनकार तथा भाविक या सोहळ्यात उपस्थित राहणार असून कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन वीरशैव नेते संस्थान अध्यक्ष बसवेश्वर यादव यांनी केले आहे.



शिवभक्त परायण होनराव गुरुजी यांच्या सुमधुर वाणीतून शिवकथा मांडली जात असून शिवनाम सप्ताह प्रसंगी सर्व शिभप अलकाताई तोंडारे नागापूर, संजय महाराज येळापुरे, अमोल महाराज लांडगे बनवस, धनराज बुलबुले सामनगाव, लक्ष्मण विभुते गुरुजी लातूरकर, भगवंत बाबा पाटील चामर्गेकर, बालाजी महाराज पाटील येरोळकर यांचे शिव किर्तन संपन्न होणार आहेत. सुप्रसिद्ध बसव कथाकार श्री शिवानंद हैबतपुरे महाराज उदगीर यांचे प्रसादाचे कीर्तन २ फेब्रुवारी रोजी दुपारी संपन्न होणार असून सोपानराव चिलवंत यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यास राज्यभरातून सुप्रसिद्ध कीर्तनकार गायनाचार्य मृदंगाचार्य भजनी उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्यात उपस्थित राहण्याचे आवाहन वीरशैव नेते व भावनात मंदिर संस्थांचे अध्यक्ष बसवेश्वर यादव, सचिव रवी कदम सह श्री मारुती व भावनाथ मंदिर संस्थान सह भावठाणा ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# घरफोडी करणारा आंतरराज्यीय सराईत गुन्हेगार जेरबंद
## सोने-चांदीसह १६ लाखांहून अधिक मुद्देमाल हस्तगत

पुणे: ग्रामीण पोलिसांच्या गुन्हे शाखेने घरफोडी करणाऱ्या आंतरराज्यीय सराईत गुन्हेगारास जेरबंद करून साडे आठ तोळे सोन्याचे दागिने, दोन किलो चांदीची भांडी, रोख रक्कमेसह १६ लाख ५८ हजार रूपयांचा मुद्देमाल केला हस्तगत केला आहे. भोर शहरात श्रीपतीनगरमध्ये १३ जानेवारीच्या रात्री कुलुप बंद असलेल्या चार घरांमध्ये कडी कोयंडा उचकटून घरफोडी करण्यात आली होती. या चोरीमध्ये अज्ञात चोरट्याने वेगवेगळया घरातील सोन्या-चांदीचे दागिने, रोख रक्कम असा एकूण २६ लाख ३५ हजार ८७४ रूपयांचा मुद्देमाल चोरी केला होता.






याप्रकरणी माधव दामोधर पुरोहीत (६४ , रा. श्रीपतीनगर, भोर ) यांनी फिर्याद दाखल केली होती. आरोपी लखन अशोक कुलकर्णी ऊर्फ सचिन राजू माने ( ३१ रा, मंगळवेढा, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर) यास अटक करण्यात आली. तो घरफोडी करणारा सराईत गुन्हेगार असून त्याने गुजरात, कनार्टक, महाराष्ट्र राज्यात ठिकठिकाणी घरफोडीचे गुन्हे केलेले आहेत. त्याचेवर ५० पेक्षा अधिक घरफोडीचे गुन्हे दाखल आहेत. आरोपीने कर्नाटक राज्यात चोरी केल्यानंतर सात वर्षांची शिक्षा भोगलेली आहे. भोर शहरातील मध्यवती ठिकाणी एकाच वेळी चार कुलुप बंद असलेल्या घरांमध्ये घरफोडी करुन मोठा मुद्देमाल चोरण्यात आला होता. यामुळे घटनेची पोलीस अधिक्षक पंकज देशमुख यांच्याकडून गंभीर दखल घेतली होती. त्यांनी स्थानिक गुन्हे शाखेला तपासाच्या सुचना दिल्या होत्या. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर यांनी तपासात भाग घेत एक पथक नेमले होते. तपासादरम्यान घटनास्थळाकडे जाणाऱ्या येणाऱ्या सर्व रस्त्यांवरील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. या घटनेत एकच संशयीत व्यक्ती घटनास्थळी जाताना दिसत होता. गुन्हा घडण्यापुर्वीचे सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले असता तोच व्यक्ती चोरी होण्यापूर्वी सहा ते सात तास अगोदर श्रीपतीनगर परिसरात येवून गेला असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे त्यानेच चोरी केल्याची खात्री झाली. सीसीटीव्ही फुटेजवरुन घरफोडी करणारा रेकॉर्डवरील गुन्हेगार सचिन राजु माने असल्याचे निष्पन्न झाले. तपासात तो २४ जानेवारीला शिरवळ कडून पुण्याकडे जात असल्याची माहिती मिळाली. पथकाने त्याचा पाठलाग करत त्यास पुणे-सातारा रोडवरील ससेवाडी परिसरात ताब्यात घेतले. . चौकशी करता त्याने गुन्हा केल्याचे सांगितले, त्याने गुन्हा करण्यासाठी हुंदाई इलेंट्रा कारचा वापर केला होता. यामुळे इतर मुद्देमालासह कारही हस्तगत करण्यात आली.

ही कामगिरी पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी तानाजी बरडे, यांचे मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर, पोलीस निरीक्षक अण्णासाहेब पवार, सहायक पोलीस निरीक्षक दत्ताजीराव मोहिते, अंमलदार बाळासाहेब खडके, अमोल शेडगे, मंगेश भगत, महेश बनकर, मंगेश विगळे, विजय कांचन, धिरज जाधव, अजित भुजबळ, काशिनाथ राजापुरे, केतन खांडे, अतुल मोरे यांनी केली. यातील फिर्यादी माधव पुरोहीत हे सेवानिवृत्त असून त्यांची आयुष्याची शिदोरीच गेल्यामुळे त्यांनी अतिशय हळहळ व्यक्त केली होती. हा गुन्हा उघडकीस आल्याने त्यांचेसह श्रीपतीनगर मधील पिडीत कुटुंबांनी पोलिसांचे आभार मानले. तर भोर शहरातील ग्रामस्थांकडून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाचे कौतुक करण्यात आहे.

# नारायणगावला अडीच लाखांचा ऐवज पळविला

नारायणगाव : नारायणगाव पोलिस ठाणे हद्दीतील गव्हाळी मळा येथील तानाजी बबन भुजबळ (वय ६२) याच्या घरात प्रवेश करून चोरट्यांनी रोख २७ हजार, साडेतीन तोळे वजनाचे दागिने असा एकूण अडीच लाखांचा ऐवज पळविला. ही घटना (दि. २६) मध्यरात्री घडली. यानंतर चोरट्यांनी बाजूला असलेल्या ज्ञानेश्वर दत्तात्रय भुजबळ व अरुण बाबूराव घोडेकर यांचे बंद घर फोडून चोरीचा प्रयत्न केला. या घटनेची माहिती समजतात रात्री दीड वाजता पोलिस पथक घटनास्थळी पोहोचले. सोमवारी सकाळी (दि.२७) वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन घराभोवती जाळी तसेच सीसीटीव्ही कॅमेरे बसवावे असे आवाहन केले.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नारायणवाडी येथील तानाजी बबन भुजबळ यांच्या घरात रात्री एक वाजण्याच्या सुमारास चोरट्यांनी दरवाजा उचकटून प्रवेश केला. घरातील महिलांना शांत बसा अन्यथा मारून टाकून असे हिंदीतून सांगितले. त्यानंतर दोन महिलांच्या गळ्यातील व कानातील दागिने हिसकावून घेतले. कपाटातील २५ हजार रुपये व तानाजी भुजबळ यांच्या मुलाच्या खिशातील दोन हजार रुपये असा एकूण अडीच लाखांचा मुद्देमाल घेऊन ते पसार झाले. चोरट्यांनी घराला बाहेरून कडी लावून पोबारा केला. भुजबळ यांनी फोन केल्यानंतर बाजूचे लोक गोळा झाले. त्यांनी पोलिसांना याची माहिती दिली. सहायक पोलिस निरीक्षक महादेव शेलार व त्यांचे पथक घटनास्थळी आले. त्यांनी चोरट्यांचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला, परंतु अंधार असल्याने चोरटे पळून गेले.

नारायणगाव पोलिस ठाण्यात अवघे ४० कर्मचारी आहेत. यात ३ अधिकारी, १८ महिला कर्मचारी आहेत. ६ कर्मचाऱ्यांना टेबलवर काम करावे लागते. यातील काही जण रजेवर असतात. दररोज फक्त २८ जण असतात. त्यामुळे उर्वरित पोलिसांवर कामाचा ताण पडतो. पोलिस अधीक्षक डॉ. पंकज देशमुख यांनी कर्मचारी संख्या वाढवून द्यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सूरज वाजगे यांनी केली आहे.

# इम्युनोग्लोब्यूलिन' इंजेक्शन मोफत द्या..!
## केंद्रीय राज्यमंत्री मोहोळ यांचे आदेश

पुणे : गुलियन बॅरी सिंड्रोमच्या (जीबीएस) रुग्णांसाठी महापालिकेच्या कमला नेहरू रुग्णालयात मोफत उपचार होणार आहेत. तर खासगी रुग्णालयातील रुग्णांना 'शहरी गरीब योजने'तून दोन लाख रुपयांपर्यंतची मदत केली जाणार आहे.

या आजारासाठी दिले जाणारे 'इम्युनोग्लोब्यूलिन' हे इंजेक्शन मोफत उपलब्ध करून दिले जाईल, अशी माहिती केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिली. 'जीबीएस'च्या वाढत्या रुग्णसंख्येच्या पार्श्वभूमीवर मोहोळ यांनी महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, आरोग्य प्रमुख डॉ. नीना बोराडे यांच्याशी चर्चा करून आढावा घेतला. त्यावेळी या आजारावरील उपचार महाग आहेत त्यामुळे महापालिकेने पुणेकरांना उपचारांसाठी आर्थिक मदत करावी' असे मोहोळ यांनी दिले आहेत.

# सिंहगड इन्स्टिट्यूट्समध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

पुणे - सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटीच्या वडगाव, आंबेगाव, वारजे, कोंढवा, एरंडवणे, नऱ्हे व लोणावळा या शाखांमध्ये ७६ वा गणतंत्र दिवस मोठ्या थाटामाटात पार पडला. सिंहगड इन्स्टिट्यूट्स च्या वारजे शाखेतील ध्वजारोहण संस्थापक अध्यक्ष प्रो. एम. एन. नवले सर यांच्या हस्ते करण्यात आले. तर वडगाव शाखेचे ध्वजारोहण संस्थेच्या संस्थापक सचिव डॉ. सुनंदा नवले यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी संस्थापक अध्यक्ष प्रो. एम. एन. नवले सर व संस्थापक सचिव डॉ. सुनंदा नवले यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे मान्यवर उपस्थित होते. राष्ट्रगीताने ध्वजाला मानवंदना देऊन 'बाईक रॅली'ने कार्यक्रमाला सुरुवात झाली. यावेळी विद्यार्थ्यांनी केलेले ध्वज संचलन नेत्रदीपक होते. वडगाव, आंबेगाव, वारजे, कोंढवा, एरंडवणे, नऱ्हे व लोणावळा शाखेच्या विविध क्षेत्रात यशस्वीरित्या मानांकन मिळवलेल्या विद्यार्थ्यांना सिंहगड इन्स्टिट्यूटसचे संस्थापक अध्यक्ष प्रो. एम. एन. नवले सर व संस्थापक सचिव डॉ. सुनंदा नवले यांच्या हस्ते बक्षिसे वितरित करून त्यांचे कौतुक करण्यात आले. यानिमित्ताने विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम सादर करण्यात आले. यात प्रामुख्याने 'विविधतेत एकता' या विषयांतर्गत विद्यार्थ्यांनी विविध राज्यातील सांस्कृतिक, धार्मिक, ऐतिहासिक परंपरेची झलक दाखवली. नर्सरी च्या विद्यार्थ्यांनी सादर केलेला 'मिले सुर मेरा तुम्हारा' या नृत्यातून बालचमुने एकतेचा संदेश दिला व शेतकरी, आर्मी, पोलीस, सैनिक हे देशाचे समाजाचे महत्त्वाचा खांब आहेत हे नृत्यनाटिकेतून अधोरेखित केले. कोळी, पंजाबी, गोवन, राजस्थानी, लावणी नृत्याद्वारे भारताची अखंड परंपरा विद्यार्थ्यांनी सादर केली. 'योग' हा जीवनाचा अविभाज्य अंग बनतो आहे. देश- परदेशात त्याचे महत्त्व वाढते आहे. त्याचे नेत्रदीपक प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांनी सादर केले, तर महाराष्ट्राची परंपरा जपणारे संगीत नृत्य व वाद्य या सगळ्यांचा मेळ जमवणारे लेझीम नृत्य विद्यार्थ्यांनी सादर करून कार्यक्रमाची सांगता केली.

# राजगडावर फिरण्यासाठी आलेल्या पर्यटकाचा मृत्यू

**वेल्हे । प्रतिनिधी**

प्रजासत्ताक दिनानिमित रविवारी (दि. २६) राजगड किल्ल्यावर पर्यटकांची भरपूर गर्दी होती. गडावर ८ हजाराहून अधिक पर्यटक होते. यातच फिरण्यासाठी आलेल्या अनिल विठ्ठल आवटे (वय १८) या पर्यटकाचा पाली दरवाजाजवळ गड उतरत असताना बुरुजाचा दगड डोक्यात पडून मृत्यु झाला.

अनिल याच्या डोक्यावर दगड पडताच त्याच्या कानातून मोठ्या प्रमाणात रक्तस्राव होऊ लागला. त्याला त्याच्या सहकाऱ्यांनी वेल्हे ग्रामीण रुग्णालय येथे उपचारासाठी आणले होते. मात्र वेल्हे ग्रामीण रुग्णालयाचे डॉ. ज्ञानेश्वर हिरास यांनी अनिल त्यास मृत घोषित केले. याबाबत डॉ. हिरास यांनी सांगितले की, अनिल याच्या डोक्याला जबर जखम मार लागला होता तसेच कानातून मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाला होता. मयत अनिल आवटे हा खादगाव भाबट (ता. सेलू, जि. परभणी) येथील आहे. पोलीस भरतीच्या तयारीसाठी धायरी येथे तो चुलत्याकडे राहत होता व



धायरी येथेच पोलीस भरतीच्या प्रशिक्षणासाठी खासगी क्लासेसमध्ये तयारी करत होता. प्रजासत्ताक दिन असल्याने याच प्रशिक्षण संस्थेच्या इतर सहकाऱ्यांसमवेत अनिल हा राजगड किल्ला फिरण्यासाठी आला होता आणि डोक्यात दगड पडून त्याचा मृत्यू झाला. घटनेचा तपास वेल्हे पोलीस करत आहेत.

# अपघातात पती पत्नीचा मृत्यू

आळेफाटा : पुणे येथून कारमधून नाशिकला लग्नासाठी जात असताना पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील माळवाडी शिवारात (बोटा, ता.संगमनेर) अपघात होवून पती-पत्नीचा दुर्दैवी मृत्यू तर एकजण गंभीर जखमी झाला आहे. सदर घटना रविवार दि.२६ रोजी सकाळी साडेआठ वाजेच्या सुमारास घडली आहे. यामध्ये कारचा अक्षरशः चक्काचूर झाला आहे.

याबाबत आळेफाटा व घारगाव पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की पुणे शहरातील गुरुवार पेठ-दरेकर वाडा येथील सचिन वसंतराव दरेकर (वय ५७ ), रमा सचिन दरेकर (वय ५३), सीमा सुरेंद्र देशमुख व सुरेंद्र देशमुख असे चौघे जण रविवार दि.२६ रोजी पहाटे साडेपाच वाजता कारमधून नाशिकला लग्नासाठी चालले होते. दरम्यान, पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील माळवाडी शिवारात आले असता अपघात झाला. त्यानंतर त्यांना उपचारांसाठी आळेफाटा येथील खासगी रुग्णालयात हलविले होते. मात्र, सचिन दरेकर व रमा दरेकर या दोघांना तपासून उपचारांपूर्वीच मयत असल्याचे घोषित केले. तर गंभीर जखमी सीमा देशमुख यांच्यावर उपचार सुरू आहे. या घटनेची माहिती मिळताच तत्काळ घारगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दिगंबर भदाणे, पोकॉ. प्रमोद गाडेकर, सुभाष बोडखे, साईनाथ दिवटे यांनी अपघातस्थळी धाव घेतली. या दुर्दैवी घटनेने दरेकर कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. याप्रकरणी मयत सचिन दरेकर यांचे भाऊ सतीष वसंतराव दरेकर यांनी दिलेल्या खबरीवरुन घारगाव पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक कल्पेश दाभाडे हे करत आहे.

## मारहाण केल्याप्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबुराव चांदेरे यांच्यावर गुन्हा दाखल

पिंपरी :

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि पुणे महानगरपालिकेचे माजी नगरसेवक तसेच स्थायी समितीचे माजी अध्यक्ष बाबुराव चांदेरे यांच्यावर मारहाण प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चांदेरे यांच्यावर जमिनीच्या वादातून एकाला मारहाण केली. याचा व्हिडियोदेखिल सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. बाबुराव चांदेरे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निकटवर्तीय असल्याने राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चेला उधाण आले आहे. याप्रकरणी प्रशांत शंकर जाधव (४८, रा. वारजे माळवाडी) यांनी हिंजवडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार, बाबुराव चांदेरे यांच्यासह इतर तीन साथीदारांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# महापालिका निवडणुक, संघटनात्मक बदलांबाबत कार्यकर्त्यांना बळ देण्याचे काम पक्ष करेल : संजय राऊत

**पुणे । प्रतिनिधी**

महापालिका निवडणुकीबाबत कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी स्थानिक पातळीवर निर्णय घ्यावेत. संघटनात्मक बदल करायचे असल्यास त्यादृष्टीनेही कळवावे. पक्षाकडुन कार्यकर्त्यांचा निर्णयाची गांभीर्याने दखल घेऊन बळ देण्याचे काम पक्षाकडुन केले जाईल ' अशा शब्दात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पश्चिम महाराष्ट्र विभागाचे संपर्क नेते व खासदार संजय राऊत यांनी पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना सोमवारी मार्गदर्शन केले.



खासदार राऊत यांनी सोमवारी पक्षाची शहर पातळीवरील पदाधिकारी, आजी-माजी नगरसेवकांची सारसबागजवळील बाळासाहेब ठाकरे कलादालन येथे आढावा बैठक घेतली. यावेळी पुणे जिल्हा संपर्क प्रमुख सचिन अहिर, सहसंपर्कप्रमुख आदित्य शिरोडकर, समन्वयक रवींद्र नेर्लेकर, शहर प्रमुख संजय भोसले, गजानन थरकुडे, पृथ्वीराज सुतार आदी उपस्थित होते. राऊत यांनी पक्षाच्या कार्यकर्त्यांना संघटनात्मक बांधणी व निवडणुकीची तयारीविषयी मार्गदर्शन केले. राऊत म्हणाले, प्रत्येक निवडणुक जिंकण्याच्या ध्येयानेच लढली पाहीजे. शेवटी मतदारांनी दिलेला कौल मान्य करुन पुन्हा समाजसेवेला आपण प्राधान्य दिले पाहीजे. शिवसेना पक्ष हा सर्वसामान्य लोकांना आधार देण्याचे काम करतो. त्यादृष्टीने पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी काम केले पाहीजे. पक्षाचे तरुण कार्यकर्ते व नव्याने दाखल होणाऱ्या कार्यकर्त्यांना उभारी देण्याचे कामही आपण केले पाहीजे. महापालिका निवडणुकीची तयारी करताना स्थानिक पातळीवर निर्णय घ्यावेत. संघटनात्मक बदलाबाबतही आम्हाला सांगा, त्यादृष्टीने पक्षाकडुन पदाधिकारी, कार्यकर्त्यांना बळ देण्याचे काम पक्ष करेल.'

# अल्पवयीन मुलीचा विनयभंग, संस्थाचालक महाराजाला अटक

आळंदी । प्रतिनिधी

आळंदी येथील खासगी वारकरी शिक्षण संस्थेत शिक्षण घेणाऱ्या तेरा वर्षीय अल्पवयीन मुलीचा संस्थाचालक महाराजानेच विनयभंग केला. या महाराजाला आळंदी पोलिसांनी अटक केली. किरण महाराज ठोसर (वय ३३, रा.आळंदी देवाची, ता. खेड) असे त्याचे नाव आहे. ठोसर याच्या संस्थेत पिडीत मुलगी शिक्षण घेण्यासाठी निवासी राहते. गेल्या सप्टेंबर २०२४ पासून ठोसर मुलीचा विनयभंग करीत होता. घडलेला प्रकार मुलीने आईला सांगितल्यावर आईने आळंदी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादीत सबंधित महाराजाने सदर मुलीला वेळोवेळी वेगवेगळ्या कारणावरुन हाताने चापट मारत , मारहाण करत तसेच सदर मुलीचे पाठीवरुन व छाती वरती नकोसा वाटणारा स्पर्श करुन वारंवार हात फिरवत तिचा विनयभंग केला असल्याचे म्हटले आहे.या फिर्यादीनुसार महाराजावर भारतीय न्याय संहिता कलम ७५,बालकाचे लैंगिक अपराधापासुन संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ९(एफ)१० बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण अधिनियम २०१५ चे कलम ८२ प्रमाणे ) पॉस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास आळंदी पोलीस करत आहेत.

असे प्रकार आळंदीत वारंवार घडत आहेत. निवासी वस्तीगृहात गैरप्रकार घडू नये यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याची जबाबदारी असणारा महिला व बालविकास विभाग याबाबत ठोस पावले उचलताना दिसून येत नसल्याने आळंदीकरांनी नाराजी व्यक्त केली. निवासी शाळांचे सुरक्षा ऑडिट करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

# वरंधा घाटात कार १०० फूट खोल दरीत कोसळली ; १ ठार तर ८ जण जखमी

भोर । प्रतिनिधी

पुण्यातील भोर महाड मार्गावरील वरंधा घाटात शंभर फूट खोल दरीत कार कोसळून अपघात झाला आहे. या अपघातात शुभम शिर्के (२२) या तरुणाचा जागीच मृत्यू झाला असल्याचे सांगण्यात येत आहे. तर यामध्ये अन्य ८ जण जखमी झाले आहेत.

पहाटे ४:०० वाजताच्या सुमारास उंबर्डे गावाच्या हद्दीत हा अपघात झाला. महाड होऊन भोरच्या दिशेने भरधाव वेगात येणारी कार अनियंत्रित होऊन १०० फूट खोल दरीत कोसळली. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक शिरगाव रेस्क्यू टीमचा सदस्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत पोलिसांच्या मदतीने जखमींना बाहेर काढले. अपघातात शुभम शिर्के (२२) या तरुणाचा जागीच मृत्यू झाला. तर मंगेश गुजर (२६), आशिष गायकवाड (२९), सिद्धार्थ गंधणे (२६), सौरभ महादे (२२), गणेश लवंडे (२७), अमोल रेकीणर (२७), यशराज चंद्र (२२)



आणि आकाश आडकर (२५) हे गंभीर जखमी झाले आहेत.

पुण्यातील भोर महाड मार्गावर सोमवारी पहाटे चार वाजताच्या सुमारास भीषण अपघात झाला. भोर महाड मार्गावरील वरंध घाटात इको कार महाडहून भोरच्या दिशेने जात होती. घाटातील उंबरडे गावच्या हद्दीत पहाटे चार वाजताच्या सुमारास चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटले आणि कार थेट १०० फूट दरीत कोसळली. या अपघातात एक तरुण जागीच ठार झाला असून इतर ८ जण गंभीर जखमी झाले.अपघाताची माहिती मिळताच स्थानिक शिरगांव रेस्क्यू टीमच्या सदस्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत पोलिसांच्या मदतीने जखमींना बाहेर काढलं. जखमींना तात्काळ बाहेर काढून, रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. स्थानिक शिरगाव रेस्क्यू टीम आणि पोलिसांनी बचाव कार्य केले. दरम्यान, अपघात नेमका कशामुळे झाला याचा भोर पोलीस अधिक तपास करत आहेत.

# बनावट विदेशी दारु बनविणाऱ्यांवर धडक कारवाई

दौंड । प्रतिनिधी

दौंड येथील राज्य उत्पादन शुल्क विभागाने मागील दोन दिवसांमध्ये बनावट विदेशी दारू बनविणाऱ्या धडक कारवाई करून दोन महागड्या चार चाकी वाहनांसह १९ लाख ३७ हजार ७८५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याची माहिती दुय्यम निरीक्षक प्रदीप झुंजरूक यांनी दिली.

सविस्तर माहिती अशी की, दौंड विभाग आणि पुणे या पथकाने दि. २२ आणि २३ रोजी महागड्या चारचाकी वाहनांमध्ये विदेशी दारूच्या



बाटल्या आणि बनावट विदेशी दारू भरून विक्री करणाऱ्या या पथकाने धडक कारवाई केली. खडकी आणि राजेगाव या परिसरामध्ये महागड्या चार चाकी गाड्यांमध्ये निर्जन्य स्थळी उभ्या करून बनावट विदेशी दारू ब्रँडेड, विदेशी दारूच्या रिकाम्या बाटल्या भरून सीलबंद करून विक्री करण्याचा धंदा सुरू आहे, अशी माहिती मिळाल्याने राज्य उत्पादन शुल्क, दौंड या पथकाने ही कारवाई केली. यामध्ये एकूण तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे.

दोन्ही महागड्या ब्रँडेड दारूच्य बाटल्या, झाकणे यासह यासह १९ लाख ३७ हजार ७८५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमध्ये निरीक्षक विजय रोकडे, दुय्यम निरीक्षक प्रदीप झुंजरूक, दिनेश ठाकूर, मयूर गाडे, संकेत वाजे, शुभम भटे, अशोक पाटील, प्रवीण सूर्यवंशी, सौरभ देवकर, केशव वामने यांनी सहभाग घेतला. या गुन्ह्याचा पुढील तपास विजय रोकडे प्रदीप झुंजरूक करीत आहेत.